■ वर्ष-०९ ■ अंक-१३ ■ मुंबई, मंगळवार १४ ते २० फेब्रुवारी - २०२३ ■ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

पोलीस बातमी पत्र

• संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 नसांमध्ये जमलेले खराब कोलेस्ट्रॉल झपाट्याने काढून टाकतील या गोष्टी? सेवनाची पद्धत जाणून घ्या

3 → ‘अमृत’मंथनातील काही गोड, काही तुरट!

धक्कादायक! पुण्यात दुहेरी हत्याकांड,रक्ताने माखलेला टिकाव घेऊन आरोपी रस्त्यावर, पोलिसांनी घेतलं ताब्यात ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## कारचालकाने वाहतूक पोलिसाला दीड किलोमीटर फरफटत नेलं, वसईमधील खळबळजनक घटना



**वसईमध्ये एका कारचालकाने वाहतूक पोलिसाला जवळपास दीड किलोमीटर फरफटत नेल्याची घटना घडली आहे. या घटनेनंतर कारचालकावर गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे.**

कारचालकाने वाहतूक पोलिसाला दीड किलोमीटर फरफटत नेल्याची घटना समोर आली आहे. वसईमध्ये घडलेल्या या घटनेनं एकच खळबळ उडाली असून याप्रकरणी वाहतूक पोलिसाच्या तक्रारीनंतर माणिकपूर पोलिसांनी गुन्हा दाखल करून कार चालकाला अटक केली आहे. सावेश सिध्दिकी असे अटक केलेल्या या कारचालकाचे नाव आहे.

त्याच्यासोबत असलेल्या त्याच्या मित्राला देखील पोलिसांनी ताब्यात घेतलं असून पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत.

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, वसईमध्ये एका कारचालकाने सिग्नल तोडल्याने वाहतूक पोलिसाने त्याला थांबण्यास सांगितले. परंतु, कारचालकाने कार थांबवण्याऐवजी वाहतूक पोलिसाला जवळपास दीड किलोमीटर कारसोबत फरफटत नेले. रविवारी सायंकाळी वसईच्या वसंत नगरी सिग्नल जवळ ...पान ३ वर...

# शासकीय खर्चाला उरले फक्त 2 दिवस, 31 मार्च नव्हे, 15 फेब्रुवारी शासकीय विभागांसाठी खरेदीची अंतिम तारीख

मुंबई : राज्य सरकारच्या अंतर्गत सर्व विभागांच्या निविदा प्रक्रियांना मंजुरी आणि खर्चा ला मान्यता 31 मार्चपर्यंत देणे अनिवार्य असते. त्यानंतर नव्या आर्थिक वर्षामध्ये नवीन प्रस्ताव आणि मान्यता यांचा विचार केला जातो. त्यामुळे दरवर्षी हिवाळी अधिवेशनात मांडण्यात आलेल्या पुरवणी मागण्या आणि नवीन प्रस्ताव हे 31 मार्चपर्यंत पूर्ण करून त्यांना मंजुरी दिली जाते. त्यामुळे फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात सर्व शासकीय कार्यालयांमध्ये याबाबतची गडबड सुरू असल्याचे दिसते. यंदा मात्र राज्य सरकारने विभाग आणि कंत्राटदारांना धक्का देणारा निर्णय घेतला आहे. अर्थसंकल्पीय वर्षा च्या शेवटच्या तीन महिन्यात अनेक अनावश्यक बाबींवर खर्च केला जातो. त्याला आळा घालण्यासाठी वित्त विभागाने या



खरेदीवर निर्बंध आणले आहेत. खरेदीची शेवटची तारीख 15 फेब्रुवारी: राज्याच्या वित्त विभागाने सर्व प्रशासकीय विभागांना आणि त्यांच्या औपचारीतील कार्यालयांना आदेश दिले असल्याची माहिती वित्त विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली आहे. यानुसार 15 फेब्रुवारी 2023 नंतर कोणत्याही नवीन खरेदीच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात येऊ नये तसेच यानंतर कोणत्याही खरेदीचा प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता मिळणार नाही आणि प्रशासकीय मान्यता जरी असेल तरीही कोणत्याही निविदा प्रसिध्द करता येणार नाहीत असे स्पष्ट आदेश वित्त विभागाने दिले असल्याचे त्यांनी सांगितले. दरमहा निधी खर्च करणे अपेक्षित: वास्तविक अर्थसंकल्पाच्या तरतुदीनुसार ...पान ३ वर...

## पवई आयआयटीतील विद्यार्थ्याचं टोकाचं पाऊल

### वसतिगृहाच्या सातव्या मजल्यावरुन उडी मारुन संपवलं जीवन

मुंबईतील पवई आयआयटीमध्ये एका विद्यार्थ्याने वसतिगृहाच्या सातव्या मजल्यावरुन उडी मारुन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. दर्शन सोलंकी (वय 18 वर्षे) असे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्या चे नाव आहे. दर्शन हा मूळचा अहमदाबादचा असून तो तीन महिन्यापूर्वीच शिक्षणासाठी आयआयटी मुंबईत आला होता. कालच (11 फेब्रुवारी) त्याची परीक्षा झाली होती आणि आज (12 फेब्रुवारी) त्याने हे टोकाचं पाऊल



उचललं आहे. दरम्यान, या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.

दर्शन आयआयटीमध्ये बी. टेकच्या केमिकलच्या पहिल्या वर्षा त शिकत होता. तो आयआयटीतील 16 नंबर वसतिगृहाच्या 802 खोलीत राहत होता. दुपारी अचानक वसतिगृहाच्या परिसरात काही तरी पडल्याचा आवाज आल्याने एकच धावपळ झाली. त्यावेळी तेथील कर्म चाऱ्यांनी बघितल्यावर दर्शन रक्तबंबाळ अवस्थेत आढळून आला. त्याला तात्काळ आयआयटीच्याच रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, उपचार सुरु असताना त्याचा मृत्यू झाला. दर्शनचा मृतदेह राजावाडी रुग्णालयात ...पान ३ वर...

## पोलिसाकडून तरुणांना अर्धनग्न करुन पट्ट्याने मारहाण

### व्हिडीओ व्हायरल होताच अधिकाऱ्याचे निलंबन

तरुणांना अर्धनग्न करुन पोलिसांकडून पट्ट्याने बेदम मारहाण होत असल्याचा कथित व्हिडीओ नांदेड जिल्ह्यातील सोशल मीडियावर व्हायरल होत असल्याने खळबळ उडाली आहे. दरम्यान या प्रकरणी पोलीस अधीक्षकांनी चौकशीचे आदेश दिले होते. तर याच चौकशीनंतर अखेर इस्लापूर पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक रघुनाथ शेवाळे यांना निलंबित करण्यात आले आहे. रविवारी



(12 फेब्रुवारी) रोजी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी हा आदेश पारीत केला. तर या सर्व प्रकरणाची चौकशी सुरु असल्याचं देखील पोलीस अधीक्षक कोकाटे म्हणाले आहेत. दोन दिवसांपूर्वी नांदेड जिल्ह्यातील तरुणांना पोलीस ठाण्यात एका अधिकाऱ्याकडून बेदम मारहाण करण्यात येत असल्याचा कथित व्हिडीओ समोर आला होता. ज्यात हा पोलीस अधिकारी तरुणांना अर्धनग्न करुन त्यांना पट्ट्याने (पोलीस सुंदरी) मारहाण करताना पाहायला मिळत आहे. याचवेळी आजूबाजूला अनेकजण बसल्याचे पाहायला मिळत असल्याचे ...पान ३ वर...

## मीरा-भाईदरमध्ये बॉम्बस्फोट होणार असल्याचा सहपोलीस आयुक्तांना फोन, पोलिसांकडून तपास सुरू

मुंबई : मुंबई पोलीस सहआयुक्तांना मध्यरात्री दोन वाजताच्या सुमारास एका अज्ञात व्यक्तीचा फोन आला आणि पोलीस दलात एकच खळबळ उडाली. मीरा-भाईदरमध्ये बॉम्बस्फोट होणार आहे, असे त्याने सांगितले. तसेच तेथे घटनास्थळी तातडीने पोलीस पाठवण्यास सांगितले. पोलीस सहआयुक्तांनी त्याला अधिक विचारणा केली असता त्याने अपशब्द वापरून फोन कट केला. सहपोलीस आयुक्तांनी ही माहिती मुंबई पोलीस नियंत्रणाला दिली. त्यानंतर मुंबई पोलिसांनी तात्काळ मीरा भाईंदर



पोलीस नियंत्रणेला माहिती दिली. याप्रकरणी मीरा भाईंदर पोलीस आणि मुंबई पोलीस हे दोन्ही तपास करत आहेत.अपशब्द वापरून फोन कट : याप्रकरणी वरळी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. त्याचप्रमाणे अज्ञात कॉलरला शोधण्याचे तपासकार्य देखील पोलिसांनी जलद गतीने सुरू केले होते. मुंबई पोलीस दलातील पोलीस सहआयुक्तांना रात्री 2 वाजता उशिरा एका अनोळखी मोबाईल क्रमांकावरून फोन आला. फोन करणाऱ्याने स्वतःचे नाव यशवंत माने असल्याचे सांगितले. त्याशिवाय पुण्याचे गुगल ऑफिस उडवण्याच्या धमकीचा कॉल, मुंबईतील बीकेसी येथे असलेल्या गुगल ऑफिसमध्ये आला होता. ...पान ३ वर...

# भाजप पदाधिकाऱ्यावर पिस्तुल विक्रीचा आरोप, इंदूर पोलीस धडकले ठाण्यात

ठाणे: उल्हासनगर कॅम्प नंबर ४ मधील भाजपचे पदाधिकारी निलेश बोबडे हे कुटूंबासह राहतात. त्यातच मध्यप्रदेश राज्यातील इंदोर पोलिसांनी १० फेब्रुवारी रोजी आरोपी इस्माईल अब्दुल अब्बासी नावाच्या व्यक्तीला पिस्तूलासह इंदोर शहरातून अटक केली होती. त्यानंतर इंदोर पोलीस पथकाने आरोपी इस्माईलकडे अधिक चौकशी केली असता, तो एका चिकन विक्रीच्या दुकानात काम करीत असल्याचे समोर आले. त्यानंतर आरोपी इस्माईलकडे पिस्तूल कुठून आले याची पोलिसांनी चौकशी केली असता त्याने हे पिस्तूल भाजप पदाधिकारी निलेश बोबडे यांच्याकडून विकत घेतल्याचे सांगितले. अन् पोलीस धडकले ठाण्यात: त्यानंतर ह्या घटनेचा तपास करण्यासाठी रविवारी १२ फेब्रुवारी रोजी इंदोर पोलिसांचे एक पथक उल्हासनगरमध्ये दाखल झाले. त्यांनी स्थानिक पोलिसांच्या मदतीने



नीलेश बोबडे यांना विठ्ठलवाडी पोलिस ठाण्यात बोलवून त्यांच्याकडे चौकशी केली. यानंतर कल्याण पूर्वेतील भाजप आमदार गणपत गायकवाड आणि उल्हासनगरचे भाजप आमदार कुमार अयलानी या दोन्ही आमदारांनी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात आपल्या समर्थकांसह धाव घेतली. बोबडे म्हणतात, मला फसविण्याचा प्रयत्न: याविषयी भाजप पदाधिकारी ...पान २ वर...

## बेपत्ता असणाऱ्या चिमुरड्या बहिण-भावांचे मृतदेह आढळले विहिरीमध्ये

सांगली: नाशिक जिल्ह्यातल्या सुरगाणा येथील आनंद गवळी आणि त्यांच्या पत्नी हे दोघेजण जत तालुक्यातल्या अमृतवाडी येथील बागायतदार शेतकरी दीपक हत्ती यांच्याकडे कामाला होते. चार दिवसांपूर्वी आनंद गवळी यांच्या पत्नीची तब्येत बिघडल्याने उपचारासाठी आनंद गवळी यांनी पत्नीला जत या ठिकाणी उपचारासाठी नेले होते. यावेळी त्यांची असणारी चार मुले घरात होती. सायंकाळी परत आल्यानंतर त्यांची दोन मुले झोपलेली आढळून आली. तर सुलोचना आणि इंद्रजित ही मुले गायब असल्याचे निदर्शनास आले. यानंतर दोन्ही भावंडांचा शोध घेण्यास सुरुवात करण्यात आली.विहिरीत आढळले मुलांचे मृतदेह : गावात आणि जत पोलीस पोलिसांच्याकडून देखील या मुलांचा शोध घेण्यात येत होता. तर मुले सापडत नसल्याने अपहरणाची तक्रार देखील दाखल करण्यात आली होती. यानंतर घराजवळ असणाऱ्या एका विहिरीमध्ये ही मुले पडल्याचा संशय आल्याने, त्या ठिकाणी देखील शोध मोहीम राबवण्यात आली होती.

## ऑनलाईन मेट्रिमोनिअल साईटवर ओळख

### औरंगाबादच्या व्यापाऱ्याचा मध्यप्रदेशातील विधवेवर अनैसर्गिक अत्याचार

ऑनलाईन मेट्रिमोनिअल साईटवर ओळख झालेल्या औरंगाबाद शहरातील एका व्यापाऱ्याने मध्य प्रदेशातील जबलपूर येथील विधवेला लग्नाचे आमिष दाखवून अनेकवेळा अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी मध्य प्रदेशातील जबलपूरमधील विजयनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुमीत सुरेंद्र गुप्ता (रा. एन 1, सिडको) असे गुन्हा दाखल झालेल्या औरंगाबादेतील व्यापाऱ्याचे नाव आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, औरंगाबाद शहरातील एका व्यापाऱ्याने ऑनलाईन मॅट्रिमोनिअल साईटवर ओळख झालेल्या मध्य प्रदेशातील जबलपूर येथील विधवेला लग्नाचे आमिष दाखवून अनेकवेळा अत्याचार केले. एवढंच नाही तर या महिलेकडून या व्यापाऱ्याने 10 लाख 50 हजार रुपयेसुद्धा उकळले. धक्कादायक म्हणजे विधवेचा अपघात झाल्यानंतर देखील आरोपीने अनैसर्गिक अत्याचार केले. तसेच त्यानंतर विधवेला लग्नास नकार देत दोघांचे आक्षेपार्ह छायाचित्र व्हायरल करण्याची धमकी दिली. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर महिलेने ...पान २ वर...

## औरंगाबादेत गुन्हेगारांची हिम्मत वाढली! पोलीस अधिकाऱ्याला शिवीगाळ, ऑडिओ क्लिप केली व्हायरल

औरंगाबाद जिल्ह्यात गुन्हेगारी वाढली असल्याचे चित्र असताना, आता गुन्हेगारांची हिम्मत देखील वाढली आहे. चोरी, दारू, वेश्याव्यवसाय, जाळपोळ असे अनेक गुन्हे दाखल असलेल्या एका कुख्यात गुन्हेगाराने चक्क एका पोलीस अधिकाऱ्याला फोनवरून थेट शिवीगाळ केल्याचा प्रकार समोर आला आहे. एवढंच नाही तर शिवीगाळ केल्याची ऑडीओ क्लिप स्वतःच्या सोशल मीडियावर व्हायरल देखील केली आहे. त्यानंतर पोलिसांनी त्याच्यावर गुन्हा दाखल करून, त्याला




ताब्यात घेतले आहे. पण या घटनेवरून औरंगाबाद पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. जीवन केसरसिंग जारवाल राजपूत (वय 24 वर्षे, रा. बेंबल्याची वाडी, ता. औरंगाबाद) असे त्या गुन्हेगाराचे नाव आहे. आरोपी जीवन राजपूत हा जाळपोळ आणि शरीराविरुद्धच्या गुन्ह्यात मागील अनेक महिन्यांपासून फरार होता. त्याने एक हॉटेल जाळले होते. तसेच इतरही काही गुन्ह्यांमध्ये चिकलठाणा पोलिसांना जीवन हवा होता. पोलिस ...पान २ वर...

# दुचाकी तपासताना आढळला सुगंधित तंबाखू; वर्धा पोलिसांची कारवाई

वर्धा: जिल्ह्यामध्ये पोलीस अधीक्षक नुरूल हसन यांनी पदभार स्वीकारल्यापासून गुन्हेगारांची दाणादाण उडालेली आहे. त्याचबरोबर अवैध व्यवसायिकांचे धाबे दणाणले आहेत. अवैध व्यवसाय उध्वस्त करण्यात पोलिसांनी कोणतीही काटकसर सोडली नसल्याचे पुरावे वारंवार समोर येत आहेत. अशीच कारवाई वर्धा पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या एका ठिकाणी करण्यात आलेली आहे. वर्धा शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करताना, विक्री करता सुगंधित तंबाखू वर्धा येथे मोटरसायकल वरून येत असल्याबाबत गोपनीय माहिती प्राप्त झाली. ही कारवाई अन्न व औषधी सुरक्षा विभागास देण्यात आली.परप्रांतातून तंबाखूची आयात: घटनेची माहिती कळताच अन्नसुरक्षा अधिकारी घटनास्थळी हजर झाल्याने त्यांनी स्नेहल नगर, चौक सेवाग्राम रोड येथे नाकाबंदी केली. एका दुचाकीला थांबून त्यांचे ताब्यातील मोटरसायकलची पाहणी केली असता त्यामध्ये सुगंधित तंबाखूची एक किलो वजनांची अनेक सीलबंद पाकिटे आढळून आली. यासंदर्भात आरोपीस विचारपूस केली असता हा सुगंधित तंबाखू पांडुरना, मध्य प्रदेश येथून शंकर नावाचे इसमांकडून खरेदी करून



आणल्याचे मात्र याचे बिल नसल्याचे त्यांनी सांगितले. यावरून वर्धा शहर पोलीस ठाण्यामध्ये त्यांच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नुरुल हसन, अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. सागर कवाडे यांच्या मार्गदर्शनात तसेच पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा संजय गायकवाड वर्धा यांच्या आदेशावरून पोलीस उपनिरीक्षक अमोल लगड, गजानन लांबसे, अमोल ढोबळे आणि अभिजीत वाघमारे यांनी केली आहे. पोलिसांच्या या दमदार कारवाईचे कौतुक होत आहे.

अकोल्यात सुगंधित तंबाखू जप्त: अकोला पोलिसांनी 12 फेब्रुवारी, 2021 रोजी तंबाखूसह आयशर ट्रक असा २० लाख ६८ हजारांचा मुद्देमाल जप्त केला होता. चालक मेहबूबमिया पिरसाहबमिया आणि क्लिनर रहमतमिया अहमदमिया मलिक यांच्यावर एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली. या कारवाईमुळे अवैध व्यवसायिकांचे धाबे दणाणले होते.

गोंदिया पोलिसांची कारवाई: गोंदिया तालुक्यातील चिचगड रोडवरील परस टोल्याजवळ एका संशयित वाहनातून १६ हजाराचा सुगंधित तंबाखूसाठा देवरी पोलिसांनी जप्त केला. ही कारवाई गुरुवारी २७ ऑगस्ट, 2020 रोजी सायंकाळी ५ च्या सुमारास झाली. या प्रकरणी पोलिसांनी एका आरोपीला अटक केली होती. चिंचगड रस्त्यावरील कृष्णा हार्डवेअर समोर पोलिसांना एक टाटा सुमो (क्र. सीजी. ०७ एम १८९८) संशयितरित्या आढळून आली होती. पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यात २ प्लास्टिक पोत्यांमध्ये तंबाखूची २०० पाकिटे आढळली. प्रत्येक पाकिटांची किंमत ८० रुपये असल्याचे सांगितले जात आहे. पोलिसांनी ही सर्व पाकिटे व अडीच लाख किंमत असलेली टाटा सुमो जप्त केली होती. तसेच एका आरोपीला अटक केली होती. याप्रकरणी देवरी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील पोलीस उपनिरीक्षक किशोर लिल्हारे यांच्या तक्रारीवरून देवरी पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस बातमी पत्र
मुंबई
२
मुंबई, मंगळवार १४ ते २० फेब्रुवारी - २०२३

# साप्ताहिक राशी भविष्य

## मेष — प्रतिष्ठा शाबूत राहील

आशादायक परिस्थिती निर्माण होऊ शकेल. यशाबद्दल अपेक्षा न ठेवता प्रयत्नांची जोड देऊन आपले कार्य व नियोजित उपक्रम सुरू ठेवता येणे शक्य होईल. मानसिक स्थिती विचलित न होऊ देता प्रयत्नशील राहा. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. खाण्याची पथ्ये पाळा. अनुकूल ग्रह आपली प्रतिष्ठा शाबूत ठेवू शकतील.

**शुभ दिनांक** १२, १३, १८.

## वृषभ — व्यवहार आनंददायी

पैसे खर्च करायचे नाहीत, काटकसरीने राहायचे असे तुम्ही म्हणत राहाल. परंतु वेळ आली की स्वत:च खर्च वाढवाल. सगळे कसब पणाला लावणे हिताचे ठरणार. वैवाहिक जीवनात चांगल्या गोष्टींची नोंद होईल. स्थावराचे व्यवहार आनंददायी ठरतील. कला, साहित्य, संगीत अशा विविध क्षेत्रांतून आपल्याला मागणी वाढणार आहे.

**शुभ दिनांक** १२, १३, १४, १५.

## मिथुन — व्यापारात चांगला उठाव

व्यापारीवर्गाला दिशा मिळेल. खरेदी-विक्रीचे अपेक्षित आकडे गाठता येतील. व्यापार चांगलाच उठाव देईल. भागीदारीतून प्रश्न मार्गी लागतील. स्वत:चे हितसंबंध जपण्यासाठीचे प्रयत्न यशस्वी ठरतील. स्थावराच्या व्यवहारात गाडी पुढे जाईल. नोकरदारांनाही गोड बोलून केलेल्या कामात चांगलाच प्रतिसाद मिळत राहील.

**शुभ दिनांक** १४, १५, १६, १७.

## कर्क — यशाची अपेक्षा नको

व्यवसायात प्रगती करता येणे सोपे झाले असते पण हितशत्रू अस्थिरता निर्माण करण्याची शक्यता. सतर्क राहणेच योग्य ठरेल. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. येणारे प्रश्न सामंजस्याने, शांततेने सोडवा. कलाक्षेत्रात चमकण्याची संधी मिळेल. शिक्षण क्षेत्रात सुयशाची अपेक्षा ठेवू शकाल. प्रकृतीस्वास्थ्य मात्र जपा.

**शुभ दिनांक** १६, १७, १८.

## सिंह — व्यवहार चोख ठेवा

कामकाजात अडथळे, वाढते खर्च, वरिष्ठांची नाराजी, व्यवहारात अडथळे यामुळे काहीसा त्रास सहन करावा लागेल. स्पर्धा, साहसी कृत्ये टाळा. प्रवासात सावधानता बाळगा. चिकाटीने काम केल्यास उपक्रम पुढे सरकू शकाल. प्रकृतीची पथ्ये पाळा. आर्थिक व्यवहारात चोखपणा ठेवा. कोर्ट कामात सफलता मिळू शकेल.

**शुभ दिनांक** १२, १३, १८.

## कन्या — कार्य साध्य करा

महत्त्वाचे प्रश्न व कामे मार्गी लावू शकाल. काही पथ्ये पाळावी लागणार आहेत. खर्च टाळा, वाहनांच्या वेगावर योग्य नियंत्रण ठेवा. साहसी प्रयोग टाळा आणि बौद्धिक गोष्टींना प्राधान्य द्या. वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारा. प्रकृतीची पथ्ये पाळा. कलाक्षेत्राला प्रोत्साहन. प्रवास कराल. बुद्धीला चालना द्या व कार्य साध्य करा.

**शुभ दिनांक** १४, १५.

## तूळ — अपेक्षित साध्य गाठाल

ग्रहमान उत्साही स्वभावाला खतपाणी घालणारे आहे. चांगल्या प्रसंगांची नोंद होईल. त्यातून मंगलकार्य अंतिम टप्प्यात येईल. मनपसंत खरेदी होत राहील. व्यापार-व्यवसायात चांगली पावले पडत राहतील. आर्थिकदृष्ट्या अपेक्षित असे साध्य गाठता येईल. नोकरदारांना जुन्या चुका कळल्याने त्या दुरुस्तीच्या संधी मिळतील.

**शुभ दिनांक** १२, १३, १६, १७.

## वृश्चिक — विचारपूर्वक निर्णय घ्या

कामाची वाटचाल करताना अनेक अडथळे व प्रश्न उपस्थित होतील. मानसिक त्रास सहन करावा लागेल. उद्योग व्यवसायात फार सावधतेने वागणे हितकारक ठरणार आहे. कायदा व नियमांचे पालन कटाक्षाने करावे लागेल. विचारपूर्वक महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागतील. कलावंतांना चांगली संधी मिळेल. प्रवास सुखकारक ठरतील. सामाजिक क्षेत्रात आपल्या कार्याचा गौरव होईल.

**शुभ दिनांक** १४, १५, १८.

## धनु — मनासारखे घडेल

कामाचा ताण वाढत असला तरी त्यातून स्वत:ला सिद्ध करता येईल. नियोजन, योग्य वेळी केलेली योग्य कृती यातून मनासारखे घडत राहील. आरोग्यदृष्ट्या बिघडवणारे ग्रहमान नसले तरी कोणताही अतिरेक टाळणे गरजेचे ठरेल. वैवाहिक जीवनात अनेक प्रसंग मनपसंत राहतील. घर, नवे वाहन हे स्वप्न पूर्ण करू शकाल.

**शुभ दिनांक** १२, १३, १६, १७.

## मकर — यशाला सोनेरी किनार

सल्ला वेळीच अमलात आणत गेल्यास अनेक उठाठेवी करता येतील. त्यातून मोठा आर्थिक पल्ला गाठता येईल. पुढील कालावधीसाठीची तरतूद करून ठेवता येईल. नव्या व्यवसायाला चांगले खतपाणी मिळत राहील. वाढणाऱ्या ओळखी आणि येणारे नवे हितसंबंध यातून यशाला वेगळी सोनेरी किनार देऊ शकाल.

**शुभ दिनांक** १२, १३, १४, १५, १८.

## कुंभ — ठरवल्याप्रमाणे पुढे जाल

चांगले ग्रहमान आलेले आहे. वाढणारा आत्मविश्वास, मिळणारे सहकार्य, येणारे प्रस्ताव आणि होत असलेली कामे यातून छानसे परिणाम हाती येत राहतील. ठरवल्याप्रमाणे पुढे जाता येईल. कौटुंबिक जीवनात मंगलकार्याचे बेत सफल ठरतील. प्रेमप्रकरणे योग्य मार्गावर येतील. नोकरदारांना केलेल्या कष्टाचे पूर्ण फळ मिळेल.


**शुभ दिनांक** १४, १५, १६, १७.

## मीन — विचार करून कृती करा

काही अडथळे येण्याची शक्यता. एकूण परिस्थितीचा विचार करूनच कृती करणे योग्य. बौद्धिक क्षेत्राचा योग्य उपयोग करून घ्या. कला क्षेत्रात चमकण्याची संधी मिळेल. प्रवास योग येतील. कायदा कटाक्षाने पाळा. वरिष्ठांशी मिळते- जुळते घेण्याचे धोरण अवलंबून वादविवाद टाळा. वाहनांच्या वेगावर योग्य नियंत्रण ठेवा.

**शुभ दिनांक** १६, १७, १८.

# नसांमध्ये जमलेले खराब कोलेस्ट्रॉल झपाट्याने काढून टाकतील या गोष्टी? सेवनाची पद्धत जाणून घ्या




शरीरातील कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढणे ही एक गंभीर समस्या बनत चालली आहे. कोलेस्टेरॉल हा एक खराब चिकट पदार्थ आहे जो रक्ताच्या नसांमध्ये जमा होतो. शरीरातील कोलेस्टेरॉलची पातळी वाढल्याने हृदयविकार, रक्तवाहिनीचे आजार, हृदयविकाराचा झटका आणि पक्षाघात यांसारख्या घातक आजारांचा धोका वाढू शकतो. शरीरातील कोलेस्टेरॉलची पातळी वाढल्याने लठ्ठपणा, जास्त घाम येणे, त्वचेचा रंग बदलणे, छाती व पाय दुखणे असे त्रास होऊ शकतात. जेव्हा तुमच्या शरीरात एलडीएल कोलेस्टेरॉलचे प्रमाण जास्त असते तेव्हा ते तुमच्या रक्तवाहिन्यांच्या भिंतींवर जमा होऊ लागते. ज्यामुळे हृदयविकार आणि स्ट्रोक सारख्या समस्यांचा धोका वाढतो. जर तुमचे कोलेस्टेरॉल जास्त असेल आणि तुम्हाला ते कमी करायचे असेल तर उत्तम उपचार म्हणजे तुमचा आहार. आयुर्वेदिक तज्ज्ञ डॉ.सलीम झैदी यांच्या मते, आहाराच्या माध्यमातून तुम्ही रक्तवाहिन्यांमध्ये जमा झालेले खराब कोलेस्टेरॉल सहज काढून टाकू शकता. काही खास पदार्थांचे सेवन केल्याने तुम्ही शरीरातील नसांमध्ये जमा झालेले खराब कोलेस्टेरॉल सहज काढून टाकू शकता. आहारात ओट्सचा समावेश खराब कोलेस्ट्रॉल काढून टाकेल..

जर तुम्हाला शरीरातील खराब कोलेस्ट्रॉल काढून टाकायचे असेल तर तुमच्या आहारात ओट्स खा. ओट्समध्ये विरघळणारे फायबर असते जे लहान आतड्यांमधून अतिरिक्त चरबी आणि साखर शोषण्यास थांबवते. याचे सेवन केल्याने आतड्यांमध्ये जमा झालेले घाणेरडे कोलेस्टेरॉल शरीरातून बाहेर पडते. ओट्सचे सेवन केल्याने वाईट कोलेस्ट्रॉल कमी होते आणि चांगले कोलेस्ट्रॉल वाढते. कोलेस्ट्रॉल नियंत्रित करण्यासाठी सर्वा तमहत्वाचे अन्न म्हणजे ओट्स, जे तुम्ही सकाळच्या नाश्त्यात खाऊ शकता.

बार्लीचे सेवन करा कोलेस्ट्रॉल नियंत्रणात राहील ओट्सप्रमाणे बार्लीच्या सेवनानेही कोलेस्ट्रॉल सहज नियंत्रित करता येते. बार्ली हा विरघळणाऱ्या फायबरचा उत्कृष्ट स्रोत आहे जो कोलेस्ट्रॉल नियंत्रित करतो आणि हृदयाचे आरोग्य सुधारतो. बार्लीच्या सेवनाने कोलेस्ट्रॉल नियंत्रित राहते, असे अनेक संशोधनांतून समोर आले आहे. ज्या लोकांना कोलेस्ट्रॉल जास्त आहे त्यांनी त्यांच्या आहारात बार्लीचा समावेश करावा. बार्लीचे सरबत बनवून तुम्ही सेवन करू शकता.

## औरंगाबादेत गुन्हेगारांची

आल्याची माहिती समजताच तो प्रत्येकवेळी पळून जात होता. दरम्यान दोन दिवसांपूर्वी चिकलठाणा पोलिसांचे एक पथक हद्दीमध्ये जीवन राजपूतचा शोध घेत होते. तेव्हा एका ठिकाणी त्याचा साथीदार पोलिसांना आढळला. त्याच्याकडे चौकशी करीत असतानाच त्या साथीदाराने राजपूत यास फोन लावून दिला. तेव्हा त्याने पोलिस अधिकाऱ्याला फोनवरून शिवीगाळ केली. तसेच पोलिस अधिकाऱ्यास जिवे मारण्याची धमकीही दिली.

दोन स्टार लागले म्हणजे डॉन झाला का? जीवन राजपूतने यावेळी फोनवरून पोलीस अधिकाऱ्याला प्रचंड शिवीगाळ केली. "पीएसआय आहे म्हणून माजला का? तुझ्यात दम असेल तर मला अटक कर, माझ्यात दम असून, तुला मी मारणार म्हणजे मारणारच आहे. तू टोले खाणार आहे. माझी खूप लहान केस आहे, मला तुम्ही उगाच परेशान करू नका, मला अटक करा आणि आतमध्ये टाका हे तुम्हाला आधीच सांगितले होते. मी मागे सरकत नाही. तुला दोन स्टार लागले म्हणजे तू डॉन झाला का?...मी एकटा येऊन तुला भिडतो, कुठ भिडायचं सांग...औरंगाबादमध्ये मी सहा ठिकाणी धंदे करतो. लपून-छपून धंदे मी करत नाही, असे या ऑडिओ क्लिपमध्ये जीवन राजपूत बोलताना पाहायला मिळत आहे. गुन्हेगारांची हिम्मत वाढली दरम्यान या सर्व प्रकाराची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना समजताच, त्यांनी आरोपीला बेड्या ठोकण्याचे आदेश दिले. त्यानुसार सातारा परिसरात शोध घेऊन राजपूतला पोलिसांनी बेड्या ठोकल्या. दरम्यान त्याच्यावर चिकलठाणा पोलिसात गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे. मात्र गुन्हेगारांची थेट फोनवरून पोलिसांना उघड धमकी देण्याची हिम्मत कसे होते, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

## ऑनलाईन मेट्रिमोनिअल साईटवर ओळख

पोलिसात धाव घेत बलात्कार, फसवणुकीचा गुन्हा नोंदवला आहे. अपघातात जखमी असताना केला अनैसर्गिक अत्याचार याबाबत पीडितेने पोलिसात दिलेल्या फिर्या दीमुसार, तिच्या पतीचे निधन झाल्यानंतर तिने एक 'मॅट्रिमोनिअल साईटवर लग्नासाठी नोंदणी केली होती. त्या ठिकाणी मार्च 2012 मध्ये समित गुप्ता याने रिक्वेस्ट पाठविली. त्यानुसार दोघांनी एकमेकांना मोबाईल नंबर शेअर केला. त्यानंतर दोघांत फोनवर संभाषण सुरू झाले. तेव्हा सुमित गुप्ता याने आपल्या पत्नीसोबत घटस्फोट होणार असून, तू मला आवडत असल्यामुळे आपण विवाह करू असे आश्वासन पीडितेला दिले. त्यानंतर पीडितेला भेटण्यासाठी तो जबलपूरला गेला. लग्नाचे आमिष दाखविल्यानंतर दोघांमध्ये 13 मे 2012 रोजी शारीरिक संबंध प्रस्थापित झाले. धक्कादायक म्हणजे अपघातात जखमी असताना आरोपीने पीडितेवर अनैसर्गिक अत्याचार केल्याचे फिर्या दीत म्हटले आहे.फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडितेने केला गुन्हा दाखल आरोपीने लग्नाचे आमिष दाखवत महिलेकडून 10 लाख 50 हजार रुपये घेतले होते. मात्र महिलेचा अपघात झाल्यावर तिला शस्त्रक्रियेसाठी पैसे लागत असल्याने तिने पैशांची मागणी केली. मात्र आरोपीने पैसेही देणार नाही आणि विवाहसुद्धा करणार नाही, अशी धमकी तीला देऊ लागला. तसेच दोघांचे आक्षेपार्ह छायाचित्र व्हायरल करण्याची धमकी देऊ लागला. दरम्यान आरोपी हा पीडितेला भेटण्यासाठी 1 फेब्रुवारीला जबलपूरला गेला. तो येताच पीडितेने विजयनगर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदविली. त्यानुसार गुन्हा दाखल होताच जबलपूर पोलिसांनी आरोपी सुमीतला बेड्या ठोकल्या. सध्या आरोपी न्यायालय कोठडीत कारागृहात आहे.

## भाजप पदाधिकाऱ्यावर

निलेश बोबडे ह्यांना विचारले असता, हा एक राजनीतिक कट असून मला फसवले जात असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे, आरोपी इस्माईलने निलेश बोबडे यांच्या मोबाईल नंबरवर संपर्क केल्याचे पोलीस तपासात आढळून आले. मात्र दोघात कुठलेही संभाषण झाले नसल्याचे तपासात निष्पन्न झाले. निलेश बोबडे यांच्यावर झालेल्या हल्ल्याशी याचा काही संबंध आहे का? असे विचारले असता, त्यांनी अधिक बोलणे टाळले. पिस्तूल विषयी आपण पोलिसांना तपासात मदत करणार असल्याचे त्यांनी पुन्हा सांगितले.

पिस्तुल विक्रीसाठी आलेल्यांना अटक: पुणे जिल्ह्यातील शिक्रापूर तालुक्यातील तळेगाव ढमढेरे येथील न्हावरा रस्त्यालगत एका ढाब्यासमोर दोन युवक गावठी पिस्तूल विक्रीसाठी येणार असल्याची माहिती 9 मे, 2021 रोजी शिक्रापूर पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलिस निरीक्षक हेमंत शेडगे यांना गुप्तहेर कडून मिळाली होती. या दोघांना गावठी पिस्तूल व तीन जिवंत काडतुसांसह जेरबंद करण्यात शिक्रापूर पोलिसांना यश आले होते.अंगझडतीत पिस्तुल जप्त: पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे शिक्रापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम साळुंखे, पोलीस उपनिरीक्षक राजेश माळी, अमोल खटावकर, नाईक योगेश नागरगोजे, लक्ष्मण शिरसकर व त्यांच्या टिमने तळेगाव ढमढेरे न्हावरा रस्त्यालगत असलेल्या न्यू अर्जुन ढाब्यासमोर सापळा लावला होता. त्यावेळी दोन संशयित युवक दुचाकीहून त्याठिकाणी आल्याचे पोलिसांना दिसले. परंतु पोलिसांची चाहूल लागताच दोन्ही युवक पळून जाऊ लागले. पोलिसांच्या पथकाने पाठलाग करत त्या दोन्ही युवकांना पकडले असता त्यांची अंगझडती घेतल्यानंतर त्यांच्याकडे एक गावठी पिस्तूल व तीन जीवंत काडतुसे मिळून आली.


महाराष्ट्र शासन
**कार्यकारी अभियंता (विद्युत) यांचे कार्यालय**
ठाणे विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग परिसर,
मराठी ग्रंथ संग्रहालयाजवळ, स्टेशन रोड,
ठाणे (पश्चिम), पिन- ४०० ६०१
महाराष्ट्र शासन
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

Website : www.mahapwd.gov.in// Email : elthane.ee@mahapwd.gov.in | दुरध्वनी क्र. ०२२-२५३३३१४४/२५३०४५१४
जा क्र. काअ/ ठाविवि/निविदा-२/ ४४४ / सन २०२३ | दिनांक : ०६/०२/२०२३

**निविदा सुचना क्र. ४० सन २०२२-२०२३**

संदर्भ :- १. सा.बां.विभाग, मंत्रालय,मुंबई शासन निर्णय क्र. सीएटी २०१७/प्र.क्र.८/इमारती-२ दिनांक २७ सप्टेंबर २०१८
२. महाराष्ट्र शासन, सा.बां. विभाग, शासन निर्णय क्र. सीएटी २०१७/प्र.क्र. ८/इमारती-, मंत्रालय, मुंबई दि. २० मे २०२१

कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा. बां. विभाग, ठाणे (पश्चिम), दुरध्वनी क्र. (०२२) २५३३३१४४ यांचेकडून महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील टक्केवारी दर (Percentage Rate) निविदा ऑनलाईन प्रणालीव्दारे मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर https://mahapwd.gov.in (Pay PWD Online) या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. येथुन डाऊनलोड करण्यात यावी.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, ठाणे, (प), दुरध्वनी क्र. (०२२) २५३३३१४४ यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम रु. | निविदा उपलब्ध कालावधी | निविदा पुर्व बैठक/ठेकेदारांचा वर्ग/ इसारा रक्कम/ कोरा निविदा शुल्क | निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | Est. No. OW/TRS/124/2022-23 Providing Octagonal Street Light Pole with Foundation, LED Fitting Underground Cable with DWC Pipe at Hostel Building at ITI Wagle Estate, Thane. | ₹ ६,०९,५२२/- | दिनांक १३.०२.२०२३. सकाळी १०.०० वाजेपासुन दिनांक २७.०२.२०२३ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदा पूर्वक बैठक नाही. ठेकेदाराचा वर्ग- ड व त्यावरील, तसेच अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु ६१००/- निविदा शुल्क रु ५००/-(+) १८% GST एकूण रु ५९०/- - | दिनांक ०३.०३.२०२३ सकाळी दुपारी १५.०० |
| ०२ | Est. No. CR/KESD/1358/2022-23 Providing Dismantling, Shifting & Repairing of Air Conditioning Unit at Ground Floor O.T. & First Floor O.T., X-Ray Room, Delivery Ward, PNC Ward, Maternity Hospital, Ulhasnagar-4, Dist-Thane. | ₹ ३,३५,७४४/- | दिनांक १३.०२.२०२३. सकाळी १०.०० वाजेपासुन दिनांक २७.०२.२०२३ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदा पूर्वक बैठक नाही. ठेकेदाराचा वर्ग- ड व त्यावरील, तसेच अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु ३४००/- निविदा शुल्क रु ५००/-(+) १८% GST एकूण रु ५९०/- - | दिनांक ०३.०३.२०२३ सकाळी दुपारी १५.०० |
| ०३ | Est. No. TESD/OW/C-32/2022-23 Providing Electrical Installation, Air Conditioning Unit And Allied Electrical Work of Meeting Hall for VC Room at District Planning Office, Thane. | ₹ ४,९०,१०६/- | दिनांक १३.०२.२०२३. सकाळी १०.०० वाजेपासुन दिनांक २७.०२.२०२३ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदा पूर्वक बैठक नाही. ठेकेदाराचा वर्ग- ड व त्यावरील, तसेच अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु ४९५०/- निविदा शुल्क रु ५००/-(+) १८% GST एकूण रु ५९०/- - | दिनांक ०३.०३.२०२३ सकाळी दुपारी १५.०० |
| ०४ | Est. No. NMESD/SR/2765 of 2022-2023 Providing renovation to E.I. of staff saction in the office of S. E., PWD Raigad Circal at 5th Floor of Kokan Bhawan, CBD Belapur, Navi Mumbai. | ₹ ४,०२,७८९/- | दिनांक १३.०२.२०२३. सकाळी १०.०० वाजेपासुन दिनांक २७.०२.२०२३ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदा पूर्वक बैठक नाही. ठेकेदाराचा वर्ग- ड व त्यावरील, तसेच अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु ४०५०/- निविदा शुल्क रु ५००/-(+) १८% GST एकूण रु ५९०/- - | दिनांक ०३.०३.२०२३ सकाळी दुपारी १५.०० |
| ०५ | Est. No. TESD/OW/City/84/2022-23 Providing Addition and Alteration of EI in Hon Collector Cabin & VIP Waiting Hall, Anti Chamber Area, WC & Open Passage near Anti Chamber of 1st Floor at Collector Office Building, Thane. | ₹ ५,६५,६१७/- | दिनांक १३.०२.२०२३. सकाळी १०.०० वाजेपासुन दिनांक २७.०२.२०२३ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदा पूर्वक बैठक नाही. ठेकेदाराचा वर्ग- ड व त्यावरील, तसेच अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु ५७००/- निविदा शुल्क रु ५००/-(+) १८% GST एकूण रु ५९०/- - | दिनांक ०३.०३.२०२३ सकाळी दुपारी १५.०० |
| ०६ | Est. No. SR/KESD/KS/2316/2022-23 Providing Repairs to Electrical Installation in Manpada Police Station, Dombiwali, Tal- Kalyan, Dist- Thane. | ₹ ४,१९,९५०/- | दिनांक १३.०२.२०२३. सकाळी १०.०० वाजेपासुन दिनांक २७.०२.२०२३ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदा पूर्वक बैठक नाही. ठेकेदाराचा वर्ग- ड व त्यावरील, तसेच अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु ४२००/- निविदा शुल्क रु ५००/-(+) १८% GST एकूण रु ५९०/- - | दिनांक ०३.०३.२०२३ सकाळी दुपारी १५.०० |
| ०७ | Est. No. TESD/CR/CITY/1041 of 2022-23 Dismantling, Erection & Repaired of Air Coditioning Unit at P.W.D. Rest House, District Court Library Room, Central Jail Server Room & Civil Hospital City Section, Thane. | ₹ ४,२३,५२१/- | दिनांक १३.०२.२०२३. सकाळी १०.०० वाजेपासुन दिनांक २७.०२.२०२३ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदा पूर्वक बैठक नाही. ठेकेदाराचा वर्ग- ड व त्यावरील, तसेच अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु ४२५०/- निविदा शुल्क रु ५००/-(+) १८% GST एकूण रु ५९०/- - | दिनांक ०३.०३.२०२३ सकाळी दुपारी १५.०० |
| ०८ | Est. No. KESD/OW/286/2022-23 Providing Shifting of LT OH Line to LT Under Ground Cable at Administrative Building (Tahasil Office ) Ulhasnagar -5, Tal- Ulhasnagar, Dist- Thane. | ₹ ५,७६,४०४/- | दिनांक १३.०२.२०२३. सकाळी १०.०० वाजेपासुन दिनांक २७.०२.२०२३ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदा पूर्वक बैठक नाही. ठेकेदाराचा वर्ग- ड व त्यावरील, तसेच अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु ५८००/- निविदा शुल्क रु ५००/-(+) १८% GST एकूण रु ५९०/- - | दिनांक ०३.०३.२०२३ सकाळी दुपारी १५.०० |
| ०९ | Est. No.TESD/OW/City/76/ 2022 -23 Providing Air Conditioning Unit for P. A. Cabin & V. C. Room at 1st Floor, Collector Office Building, Thane. | ₹ ४,३५,८६२/- | दिनांक १३.०२.२०२३. सकाळी १०.०० वाजेपासुन दिनांक २७.०२.२०२३ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदा पूर्वक बैठक नाही. ठेकेदाराचा वर्ग- ड व त्यावरील, तसेच अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु ४४००/- निविदा शुल्क रु ५००/-(+) १८% GST एकूण रु ५९०/- - | दिनांक ०३.०३.२०२३ सकाळी दुपारी १५.०० |
| १० | Est. No. KESD/SR/U/2499/2022-23 Providing Replacement of Faulty Supply Cable and Street Lights of B. G. Chaya Sub District Hospital, Ambarnath, Tal- Ambarnath, Dist- Thane. | ₹ ४,०६,९५५/- | दिनांक १३.०२.२०२३. सकाळी १०.०० वाजेपासुन दिनांक २७.०२.२०२३ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदा पूर्वक बैठक नाही. ठेकेदाराचा वर्ग- ड व त्यावरील, तसेच अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु ४१००/- निविदा शुल्क रु ५००/-(+) १८% GST एकूण रु ५९०/- - | दिनांक ०३.०३.२०२३ सकाळी दुपारी १५.०० |
| ११ | Est. No. TESD/CR/City/1039/ 2022-23 Providing replacement of Water Pump, Down Lighter & Street Light Fitting, AC in Shivneri Bungalow Office, Supply Cable of Collectors Bunglow, Street Light Fitting & Switchgears in Civil Surgeon's Dhanvantri Bungalow at Kopari Colony, Thane. | ₹ ३,१४,४८४/- | दिनांक १३.०२.२०२३. सकाळी १०.०० वाजेपासुन दिनांक २७.०२.२०२३ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदा पूर्वक बैठक नाही. ठेकेदाराचा वर्ग- ड व त्यावरील, तसेच अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु ३१५०/- निविदा शुल्क रु ५००/-(+) १८% GST एकूण रु ५९०/- - | दिनांक ०३.०३.२०२३ सकाळी दुपारी १५.०० |

1. https://mahapwd.gov.in (Pay PWD Online) या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
(सदर निविदा सुचने मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वर कळविण्यात येईल)
2. कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा. बां. विभाग, सा. बां. परिसर, ठाणे (पश्चिम), कार्यालयातील सुचना फलक.
3. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामधील नोंदणीधारक वरील निर्देशित विद्युत अनुज्ञाप्तीधारक ठेकेदारच निविदा सादर करु शकतात अन्य ठेकेदाराने सादर केलेली निविदा स्विकारली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/ -
(सं.रा.पुजारी)
कार्यकारी अभियंता (विद्युत)
ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, ठाणे

क्र. जिमाका/ठाणे/जाहि/ २०२२-२३/१४७

## संपादकीय...



# विरोधाभासाचा कोळसा आणि..

पर्यावरणस्नेही इंधनांचे आपण कितीही सामुदायिक पारायण करीत असलो तरी पेट्रोल/डिझेलपासून आपणास पुढील किमान पाच दशके तरी अजिबात मुक्ती नाही.. गतसप्ताहात अधिक चमचमीत राजकीय आणि आर्थिक विषयांच्या भाऊगर्दीत एका अत्यंत महत्त्वाच्या घटनेकडे दुर्लक्ष झाले. ही घटना म्हणजे बंगळुरू येथे भरलेली 'इंडिया एनर्जी वीक' ही भारतीय ऊर्जा परिषद. या परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पेट्रोल/डिझेल वाहनांत २० टक्के इथेनॉल मिश्रणाचा शुभारंभ केला. या इथेनॉल मिश्रणामुळे भारताचे किमान ५५ हजार कोटी रुपये इतके परकीय चलन वाचेल. ही वार्षिक बचत आपल्यासाठी अत्यंत महत्त्वाची. या समारंभाच्या बातम्या सर्वत्र झळकल्या आणि त्याहूनही झळकले मोदी यांचे पर्यावरणस्नेही जॅकेट. कमी महत्त्वाच्या घटकांस अधिक प्रसिद्धी देण्याच्या आपल्या परंपरेशी हे सुसंगतच म्हणायचे. हे असे म्हणायचे याचे कारण या परिषदेच्या कार्यक्रम पत्रिकेकडे आणि तीमधील चर्चेकडे झालेले सामायिक दुर्लक्ष पर्यायीआणि पर्यावरणस्नेही इंधन ही खरे तर या ऊर्जा परिषदेची मध्यवर्ती कल्पना. गेली साधारण पाच-सहा वर्षे याबाबतच्या उपक्रमांस जागतिक पातळीवरच मोठी गती आली असून वसुंधरेचे तपमान वाढवणारे इंधन-समूह लवकरात लवकर कसे नष्ट करता येतील यावर सर्वांचा भर आहे. ते योग्यच. पेट्रोल/डिझेल या कर्ब उत्सर्जक इंधनांवर अवलंबून राहणे किती धोकादायक हे एव्हाना सर्वांस कळून चुकलेले आहे. त्यामुळे पर्यायी, पर्यावरणस्नेही इंधनांची गरज सर्वांनाच भासू लागली आहे. विजेवर चालणारी वाहने, सौर ऊर्जा प्रणालीचा विकास, इथेनॉलचा अधिकाधिक वापर, पवन ऊर्जा दी नैसर्गिक ऊर्जा स्रोतांचा विकास अशा अनेक दिशांनी ही ऊर्जा-आसक्ती मिटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. बंगलोर येथे सुरू झालेल्या या भारतीय ऊर्जा सप्ताहात हे दिसते. पण खरा डोळ्यात भरतो या परिषदेत समोर आलेला भयाण विरोधाभास.

कोळसा या एका घटकाच्या वापरात आपण किती कमालीची आघाडी घेतली हा तो भयाण विरोधाभास. त्याचा सादर झालेला तपशील पाहून डोळ्यांसमोर अंधारी येते. याचे कारण गत आर्थिक वर्षांच्या तुलनेत भारताच्या कोळसा वापरात तब्बल ११.६ टक्के इतकी वाढ झाली असून आगामी आर्थिक वर्षांत आपले देशांतर्गत कोळसा उत्पादन १०० कोटी टनांचा ऐतिहासिक टप्पा ओलांडेल. हे इतकेच नाही. पण याच्या जोडीने आपल्या खनिज तेल वापरातही दणदणीत वाढ होईल. याचा तपशील खुद्द पंतप्रधानांच्या भाषणात आढळतो. जगात खनिज तेल वापराबाबत आपण पहिल्या पाचांत आहोत. जगात दररोज वापरल्या जात असलेल्या पेट्रोल/डिझेलादी इंधनात भारताचा वाटा तूर्त पाच टक्के इतका आहे. आगामी वर्षांत तो ११ टक्क्यांवर जाईल असे पंतप्रधानांनी अभिमानपूर्वक सांगितले. याच्या जोडीने नैसर्गिक इंधन वापरातही आपली मागणी साधारण पाच पटींनी वाढेल. आज देशातील अनेक शहरांत स्वयंपाकाचा गॅस वाहिन्यांद्वारे घरपोच पोहोचवला जातो. अधिकाधिक शहरे या वाहिन्यांनी जोडण्याचा आपला प्रयत्न आहे. पुढील चार ते पाच वर्षांत आणखी किमान ३५ हजार किलोमीटर इतका वायुवाहिन्यांचा विस्तार आपल्याकडे अपेक्षित आहे. म्हणजे या अनुषंगाने या क्षेत्रातील गुंतवणुकीतही तगडी वाढ दिसून येते. या सर्वांचा अर्थ इतकाच की पर्यावरणस्नेही इंधनांचे आपण कितीही सामुदायिक पारायण करीत असलो तरी पेट्रोल/डिझेलपासून आपणास पुढील किमान पाच दशके तरी अजिबात मुक्ती नाही. इतकेच नव्हे तर या इंधनांवर आपले अवलंबित्व अधिकच वाढेल हे उघड दिसते. ही एकवेळ मान्य व्हावी अशीच बाब. वास्तवाचे भान आणून देणारी. पण हे वास्तव डोळ्यात अंजन घालते ते सरकारच्या एका कबुलीमुळे.

विजेवर चालणाऱ्या मोटारींमुळेच कोळसा वापरात वाढ होत असल्याचे सरकारला मान्य करावे लागणे हे ते अंजन. गेल्या दोन वर्षांपासून सरकारचा भर मोठ्या प्रमाणावर विजेवर चालणाऱ्या मोटारींवर आहे. पेट्रोल/डिझेलवरील अवलंबित्व कमी व्हावे हा तो उद्देश. पण वाहनांसाठी त्यांचा वापर कमी होत असताना प्रत्यक्षात अन्यत्र या इंधनांची मागणी वाढतीच असून त्याच वेळी दुसरीकडे कोळशाच्या मागणीतही त्यापेक्षा अधिक वाढ आपण अनुभवत आहोत. आणखी १७ वर्षांत, म्हणजे २०४० सालापर्यंत केवळ विजेवर चालणाऱ्या मोटारींमुळे आपला कोळशाचा वापर दुप्पट होईल, असे सरकारच सांगते. गेल्या जानेवारी या एकाच महिन्यात कोळशाच्या मागणीत १६ टक्क्यांची वाढ झाली. याच वास्तवाचा विचार करून 'कोल इंडिया' या सरकारी क्षेत्रातील कंपनीने कोळसा खाणींचे दरवाजे अधिकच सताड उघडल्याचे दिसते. आगामी काळात या कंपनीकडून नव्या कोळसा खाणींचे नवे जवळपास दीड-डझन प्रकल्प हाती घेतले जातील. तितकेच कोटी टन कोळशाचे उत्पादन यातून अपेक्षित असेल. इतका कोळसा केवळ आपल्या देशातील खाणींतून निघेल. हा विरोधाभास येथेच संपत नाही. आयात कोळशाचे आणखी एक परिमाण त्याचे महत्त्व वाढवते. ते वाढते याचे कारण आपला स्वदेशी कोळसा ऊर्जा निर्मितीत कमअस्सल मानला जातो. त्यात मोठ्या प्रमाणावर राख असते आणि त्याचा ज्वलनांकही तुलनेने कमी असतो. म्हणजे ऊर्जा निर्मितीसारख्या महत्त्वाच्या गरजांसाठी कोळसा आयात करणे आले. ऊर्जा परिषदेच्या निमित्ताने हे विरोधाभासी सत्यदेखील समोर येते. गेल्या एकाच वर्षांत आपली कोळसा आयात १५ टक्क्यांनी वाढली असून इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आदी देशांतील कोळसा उत्पादकांसाठी भारताचे अत्यंत आकर्षक बाजारपेठ हे स्थान अधिकच आकर्षक होईल. या देशांकडून आपल्या देशात येणाऱ्या कोळशाच्या वापरात सातत्याने वाढच होताना दिसते.

# 'अमृत'मंथनातील काही गोड, काही तुरट!

अर्थसंकल्पात प्रस्तावित काही तरतुदी वरवर लाभदायी वाटत असल्या, तरी प्रत्यक्षात त्या करदात्याच्या आर्थिक नुकसानीलाही कारणीभूत ठरू शकतात. नीट समजून घेणे आवश्यक आहे अशा काही तरतुदींविषयी..

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २०२३ चा अर्थसंकल्प सादर करताना 'अमृतकाळा'चा महिमा गायला. त्यामुळे यापुढे करांतील बदल वा नवे कर प्रस्ताव यांना अमृतमंथन वगैरे म्हणावयास हरकत नसावी. अनेक समाजघटक आणि उद्योग घटक यांना 'अमृताहुनी गोड' भासावेत, असे उल्लेख व तरतुदी त्यांच्या अर्थसंकल्पात व वित्त विधेयकातही नक्कीच आहेत, मात्र प्रस्तावित तरतुदी नीट समजून घेणे गरजेचे आहे.

अर्थसंकल्पीय भाषणातील भाग दोन (पार्ट बी) मध्ये करविषयक प्रस्तावांचा उल्लेख असतो. त्यासंबंधीच्या प्रत्यक्ष तरतुदी वित्त विधेयकात असतात. त्याचे तपशीलवार खुलासे खुलासा पत्रकात (एक्सप्लेनेटरी मेमोरँडम) असतात. या सर्वांचा आढावा घेतला असता या वर्षीच्या विधेयकात काही प्रस्ताव असे आढळून येतात की त्यांचे कायद्यात रूपांतर होण्यापूर्वी संबंधित घटक व कायदा मंजूर करणाऱ्या मंडळींनी त्याची नोंद घेऊन त्यावर विचारविनिमय करणे आवश्यक वाटते. याव्यतिरिक्त असेही काही प्रस्ताव आहेत की ज्यांची फारशी चर्चा झालेली नाही, पण काही जणांना ते कदाचित उल्लेखनीय वाटू शकतात. अशा दोन्ही प्रकारच्या प्रस्तावांपैकी काहींचा संक्षिप्त आढावा या लेखात घेतला आहे.

१) या प्रस्तावांतील एक महत्त्वाचा प्रस्ताव हा लहान (सूक्ष्म आणि छोट्या) उद्योगांसंबंधी आहे. जे व्यावसायिक या लहान उद्योजकांकडून वस्तू/ सेवा खरेदी करतात, ते जेव्हा त्या खरेदीचे प्रत्यक्ष पैसे देतील, तेव्हाच त्यांना त्या खर्चाची वजावट मिळेल, असा प्रस्ताव आणत असल्याचा उल्लेख अर्थसंकल्पीय भाषणात आहे. त्यामागील हेतू चांगला आहे. तो असा की लहान उद्योजकांची येणी शक्य तितक्या लवकर वसूल व्हावीत. त्यांच्या बिलांचे पैसे अदा केल्यानंतरच या ग्राहकांना त्या खरेदी खर्चाची वजावट मिळेल, तोपर्यंत मिळणार नाही, असा या प्रस्तावाचा अर्थ. पण वित्त विधेयकात ही तरतूद भलत्याच वेगळ्या प्रकारे मांडली गेली आहे.

त्यात म्हटले आहे की 'सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास कायद्या'प्रमाणे, ज्या मुदतीत अशा लहान उद्योगांना त्यांच्या ग्राहकांनी पैसे देणे अपेक्षित आहे, त्या मुदतीत जर पैसे दिले नाहीत तर खर्चाची वजावट, कायमस्वरूपी नामंजूर होईल. म्हणजेच, झालेला विलंब विक्रेत्याला मान्य असेल व नंतर त्याला पैसे दिले गेले असतील तरीही ग्राहकाला त्या खरेदी खर्चाची वजावट मिळणार नाही. ही एवढी टोकाची तरतूद अनावश्यक आहे. या तरतुदीची खरोखर अंमलबजावणी झाली तर अशा उद्योगांकडून वस्तू/ सेवा खरेदी करण्यास प्रोत्साहन मिळण्याऐवजी उलटाच परिणाम होऊ शकेल. त्या कायद्यानुसार केवळ १५ दिवसांत रक्कम अदा करणे गरजेचे आहे. त्यानंतर पैसे दिले असता त्यावर व्याज द्यावे लागू शकते आणि तो कालावधी विक्रेत्यांच्या संमतीने ४५ दिवसांपर्यंत वाढवताही येतो.


सध्याही असे अनेक ग्राहक आहेत, जे बहुतेकदा कायद्यात नमूद कालावधीपेक्षा जास्त दिवसांनी पैसे देतात, पण पैसे बुडवत नाहीत. अनेक उद्योगांना, अनेक कारणांसाठी बहुतेकदा अध्र्या वा दीड महिन्याहून अधिक अवधी द्यावा लागतो. हे कलम लागू केले तर अशा लहान उद्योग-व्यावसायिकांचे ग्राहक अन्य पर्यायांचा विचार करतील. शिवाय अशा लहान उद्योजकांकडून खरेदी करणारे नेहमी मोठे उद्योजकच असतात असे मानण्याचे कारण नाही. हे ग्राहक स्वतःसुद्धा लहान उद्योजक असू शकतात, हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे या प्रस्तावाच्या तपशिलाबाबत/ शब्दरचनेबाबत पुनर्विचार होणे आवश्यक वाटते.

२) दुसरा प्रस्ताव परदेश प्रवासाच्या खर्चावर व विविध कारणांसाठी परदेशी पाठवायच्या रकमांवर आकारल्या जाणाऱ्या करांबद्दल आहे. आजकाल अनेकांना स्वखर्चानेही परदेश प्रवास करावा लागतो किंवा करावासा वाटतो. काहींसाठी ते आयुष्यभराचे एक स्वप्न असते. पर्यटन कंपन्यांकडून अशा परदेश प्रवासाचे पॅकेज विकत घेतले असता सध्या त्यावर पाच टक्के टीसीएस (टॅक्स कलेक्शन अॅट सोर्स) आकारला जातो. त्यामध्ये एकदम २० टक्क्यांपर्यंतची वाढ प्रस्तावित आहे. ही भरमसाट वाढ नक्कीच अनावश्यक वाटते.

परदेशी असलेल्या आपल्या नातेवाईक व मित्रमंडळींना, शैक्षणिक आणि वैद्यकीय कारणे सोडून अन्यही अनेक आवश्यक गोष्टींसाठी पैसे पाठवावे लागतात. आता त्यावरील टीसीएसचा दरही ५ टक्क्यांवरून २० टक्क्यांपर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव आहे. टीसीएसच्या माफीसाठी सध्या असलेली किमान सात लाखांची मर्यादाही यापुढे लागू होणार नाही. म्हणजे रक्कम कितीही असली तरी तिच्यावर सरसकट २० टक्के कर संकलन होईल. या प्रस्तावाचाही पुनर्विचार होणे गरजेचे आहे.

३) अशीच आणखी एक तरतूद प्रस्तावित आहे. कोणत्याही करदात्याने एखाद्या वर्षासाठी प्राप्तिकर परताव्याचा दावा केला असेल व कुठल्याही वर्षासाठी त्याचे करनिर्धारण वा पुनर्निर्धारण या प्रलंबित असतील, तर ते पूर्ण होईपर्यंत सदर परतावा रोखून ठेवता येईल. खरे तर, करनिर्धारण पूर्ण झाल्यानंतर ज्या रकमा अंतिमतः देय आहेत त्यांच्या प्रमाणात परतावा देणे समजण्याजोगे आहे. पण भविष्यातील संभाव्य करदायित्वांसाठीही तो प्रदीर्घ काळ अडकवून ठेवणे अयोग्य वाटते. याही प्रस्तावाबाबत पुनर्विचार व्हावा असे वाटते.

४) दरवर्षीप्रमाणे यंदाही चॅरिटेबल ट्रस्ट्ससाठी (समाजोपयोगी कार्य करणाऱ्या सार्वजनिक विश्वस्त संस्था) काही




प्रतिकूल आणि जाचक बदल प्रस्तावित आहे. उदा. एखाद्या चॅरिटेबल ट्रस्टने समाजोपयोगी कामांसाठी दुसऱ्या चॅरिटेबल ट्रस्टला देणगी दिली, तर देणगीदार संस्थेने त्या देणगीच्या केवळ ८५ टक्के रक्कमच समाजोपयोगी कामांसाठी वापरली, असे मानण्यात येणार आहे. तसेच आयकर कायद्याखाली मिळालेल्या नोंदण्याचे नूतनीकरण करण्यास विलंब झाला, तर त्याचे त्या ट्रस्टवर खूपच विपरीत करपरिणाम होणार आहेत. ती विश्वस्त संस्था तिच्या सध्याच्या स्वरूपातून/ रचनेतून बाहेर पडली आहे, असे मानून त्या संस्थेला 'एक्झिट टॅक्स' स्वरूपाच्या कराचे खूपच जास्त दायित्व येऊ शकेल अशा तरतुदीही प्रस्तावित आहेत. हे प्रस्ताव खूपच तांत्रिक व क्लिष्ट आहेत. खुलासा पत्रकाच्या ६४ पानांपैकी १० पाने, ही त्यांच्याबाबतच आहेत.

५) पुनर्विचार करावा असे वाटते अशी काही रंजक निरीक्षणे-

अ) प्राप्तिकर कायद्याखालील करविवाद कमी झाले असे एकीकडे सांगताना दुसरीकडे, खूप मोठ्या संख्येत दाखल होत असणाऱ्या अपिलांचा ताण आणि होणारा विलंब कमी करण्यासाठी एखादी जोडरचना आवश्यक आहे असेही म्हटले आहे. त्यानुसार अपील कमिशनर यांच्या जोडीला जॉइंट कमिशनर (अपील्स) हे पद निर्माण करण्याचा प्रस्ताव आहे. तुलनेने लहान रकमांचे आयकरविवाद नवी व्यवस्था हाताळेल, मात्र करविवाद वाढण्यामागच्या कारणांचे निराकरण यातून कसे होणार?

ब) ज्या कलमानुसार देणग्यांविषयक वजावट मिळते त्या सुपरिचित कलम ८०जी मध्ये, जवाहरलाल नेहरू मेमोरियल फंड, इंदिरा गांधी मेमोरियल ट्रस्ट आणि राजीव गांधी फाऊंडेशन या संस्थांचा उल्लेख आहे. तो उल्लेख काढून टाकण्याचा प्रस्ताव आहे. यामागे राजकीय हेतू आहे, असे वाटू शकते. याबाबत जो खुलासा दिला आहे तो असा की ८० जी कलमात तीनच संस्था या 'नेमबेस्ड' (व्यक्तिगत नावांचा उल्लेख असलेल्या) आहेत व अशा नामाधारित संस्थांची नावे वगळण्याचा प्रस्ताव आहे एवढेच!

क) वृत्तसंस्थांबाबतही एक प्रस्ताव आहे. बातम्यांचे संकलन व वितरण असे मर्यादित काम करण्यासाठी भारतात स्थापन केल्या गेलेल्या, ज्या नोटिफाइड वृत्तसंस्था आहेत, त्यांना गेली अनेक वर्षे प्राप्तिकरात माफी मिळत आली आहे. आता ती रद्द करण्याचा प्रस्ताव आहे. यामागे वृत्तसंस्थांवरील राग वगैरे कारणे आहेत, असा उगाचच गैरसमज होऊ शकतो. याबाबत असा खुलासा केला आहे की, प्राप्तिकर कायद्याखालील निरनिराळ्या करसवलती आणि वजावटी या हळूहळू रद्द करण्याचे जे काही एकूणच धोरण जाहीर केले आहे, त्याचाच एक भाग म्हणून हा प्रस्ताव आहे. बाकी विशेष कारण नाही! थोडक्यात अर्थसंकल्पातील प्रस्तावित तरतुदी नीट समजून घेऊनच त्यांविषयी समाधान व्यक्त करावे की चिंता, हे ठरवावे लागेल.

### शासकीय खर्चाला उरले फक्त

प्रत्येक विभागाने आपल्या प्राप्त निधीचा दरमहा योग्य विनियोग करावा, अशी अपेक्षा असते. मात्र असे न होता शेवटच्या तीन महिन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात निधी खर्च करण्यावर प्रशासकीय विभागांचा भर असतो. यामध्ये अनेक गैरव्यवहार सुद्धा होण्याची शक्यता असते. त्यामुळे आता अशा पद्धतीच्या खर्चाला आळा घालण्यासाठी 15 फेब्रुवारीनंतर कोणत्याही प्रकारची नवीन खरेदी करू नये, असे निर्देश वित्त विभागाने काढले असल्याची माहिती त्यांनी दिली.

कोणत्या खर्चाला तातडीने बंदी? काही प्रशासकीय विभाग नवीन खरेदीच्या निमित्ताने निधी वापरण्याचा प्रयत्न करतात. यामध्ये नवीन संगणक, संगणकाचे सुटे भाग यांच्या दुरुस्तीचे प्रस्ताव तसेच फर्निचरची दुरुस्ती, झेरॉक्स मशीन खरेदी आणि दुरुस्ती नैमित्तिक कार्यशाळा परिषद तसेच भाड्याने कार्यालय घेणे आधीच्या प्रस्तावांना मंजुरी मागितली जाते. मात्र अशा प्रकारचे कोणतेही प्रस्ताव सादर करू नयेत त्यांना मान्यता मिळणार नाही, असेही या विभागाने म्हटले आहे. आगाऊ खरेदी नको: 15 फेब्रुवारी 2023 पूर्वी मान्यता घेतलेल्या निविदा आणि खर्चाच्या प्रस्तावांना तसेच जिल्हा वार्षिक योजना आणि लोकप्रतिनिधी यांच्या स्थानिक विकास निधीतून खरेदी बाबतचे प्रस्ताव आल्यास त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार वित्त विभागाला असणार आहे. मात्र 15 फेब्रुवारी नंतर कोणतेही नवीन टेंडर प्रसिद्ध होणार नाही. तसेच काही प्रशासकीय बाबींसाठी लागणाऱ्या आवश्यक वस्तूंची खरेदी आगाऊ स्वरूपात करता येणार नाही. मात्र केंद्रीय योजना आणि केंद्रीय योजनेचा राज्य हिस्सा, औषध खरेदी तसेच काही बाह्य सहाय्य असलेले प्रकल्प यासाठी हे आदेश लागू होणार नाही, असेही विभागाने स्पष्ट केले असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले.

### पोलिसाकडून तरुणांना अर्धनग्न करुन पट्ट्याने मारहाण

दिसून येत आहे. तर या मारहाणीचा व्हिडीओ नांदेड जिल्ह्यातील सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. दरम्यान याबाबत माध्यमांमध्ये बातम्या येताच पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी याची गंभीर दखल घेतली होती. सकाळ आणि संध्याकाळ रोज हजेरी लावणे बंधनकारक अर्धनग्न तरुणास पोलीस मारहाण करत असल्याच्या व्हिडीओ लगेचच व्हायरल झाला होता. या कथित व्हिडीओची पोलीस प्रशासनाकडून, चौकशी सुरु करण्यात आली होती. ही चौकशी पूर्ण होईपर्यंत सहाय्यक पोलिस निरीक्षक रघुनाथ शेवाळे यांना पोलीस नियंत्रण कक्ष येथे संलग्न करण्यात आले होते. तर 12 फेब्रुवारी रोजी चौकशी पूर्ण झाल्यानंतर शेवाळे यांना निलंबित करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक कोकाटे यांनी काढले आहे. तसेच निलंबन काळात शेवाळे यांना मुख्यालयी सकाळ आणि संध्याकाळ रोज हजेरी लावणे बंधनकारक केले असून, परवानगी शिवाय त्यांना मुख्यालय सोडत येणार नाही, असेही निलंबन आदेशात नमूद करण्यात आले आहे. मारहाण करण्यात आलेले तरुण गौरक्षक नाहीत... अवैधरित्या गायींची तस्करी करणाऱ्या वाहनांना अडवण्याचा प्रयत्न विहिंपच्या कार्यकर्त्यांनी केल्याचा राग मनात ठेवून ही मारहाण करण्यात आल्याचा दावा विहिंपच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. याप्रकरणी राज्याच्या गृहमंत्र्यांना देखील पत्र लिहिण्यात आल्याचं विहिंपकडून सांगण्यात आलं. मात्र मारहाण करण्यात आलेले तरुण गौरक्षक नसल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. मात्र व्हिडीओत पोलीस अधिकारी रघुनाथ शेवाळे मारहाण करत दिसत असल्याने, त्यांना निलंबित करण्याचा निर्णय घेतला असल्याच पोलीस अधीक्षक कोकाटे म्हणाले आहे.

### मीरा-भाईंदरमध्ये बॉम्बस्फोट होणार असल्याचा

पुण्याचे गुगल ऑफिस उडवण्याची धमकी : गुगल ऑफिस उडवून देऊ, असा धमकीचा निनावी कॉल करण्यात आला होता. या कॉलनंतर बॉम्ब शोधक आणि नाशक बिडीडीएस पथकाकडून रविवारी रात्री संपूर्ण बिल्डिंगची तपासणी करण्यात आली. यावेळी कुठली ही वस्तू संशयास्पद आढळून आली नाही. पोलीस अधिकारी आणि बीडीडीएस पथकाकडून संपूर्ण इमारतीची पाहणी करण्यात आली. ज्या व्यक्तीने धमकीचा फोन केला होता. त्याला आता बीकेसी पोलिसांनी ताब्यात घेतले असल्याची प्रथमिक माहिती समोर आली आहे. बीकेसी पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या कॉलरने सांगितले की, त्याचे नाव पनयम शिवानंद आहे आणि तो हैदराबादचा आहे. चौकशीत काहीही संशयास्पद आढळले नाही. कॉलरला ताब्यात घेतले असून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आल्याचे बीकेसी पोलिसांनी सांगितले. दहशतवादी हल्ल्याची धमकी : मुंबईवर अतिरेकी हल्ला करण्याची धमकी काही दिवसांपूर्वी ( दि. 3 शुक्रवार) रोजी ट्विटरवरून देण्यात आली होती. त्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव पोलीस प्रशासनाकडून महत्वाच्या ठीकाणी सुरक्षेत वाढ करण्यात आली होती. तसेच पोलिसांना सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले होते. याप्रकरणी नंतर एक मोठा खुलासा समोर आला. रशियाहून गोव्याला येणाऱ्या प्रवाशाने फ्लाइटमध्ये फेक मेल आयडीवरून ट्विटर करत बॉम्ब असल्याची अफवा पसरवली होती. स्वतःची ओळख तालिबानी असल्याची केली होती. तालिबान संघटनेचा नेता सिराजुद्दीन हक्कानीच्या आदेशानुसार दहशदवादी हल्ला करण्यात येणार असल्याचे म्हटले होते. तो मेल आयडी तयार करण्यासाठी वापरण्यात आलेला क्रमांक पाकिस्तानमधील कराची येथून ऑपरेट करण्यात अल्याचे तपासत समोर आले आहे.

### कारचालकाने वाहतूक पोलिसाला

ही खळबळजनक घटना घडली आहे. काय घडलं त्या दिवशी?

वाहतूक पोलिस हवालदार सोमनाथ चौधरी हे रविवारी सायंकाळी वसईच्या वसंत नगरी सिग्नल जवळ कर्तव्य बजावत होते. यावेळी सर्कलवर रेड सिग्नल असताना एक कार चालक रेड सिग्नल तोडून पुढे आला. यावेळी सोमनाथ चौधरी यांनी त्याला हाताने कार बाजूला घेण्यासाठी इशारा केला. मात्र, कार चालकाने कार पुढे नेत चौधरी यांच्या अंगावरच गाडी घातली. चौधरी यांनी प्रसंगावधान दाखवत गाडीच्या बोनेटवर चढले आणि गाडीच्या काचेच्या मधल्या जागेत पकडले. त्यानंतर दुसऱ्यांदा त्यांनी चालकाला कार थांबवण्यास सांगितलं. मात्र, चालकाने कार न थांबवता तशीच पुढे गोखिवराच्या दिशेने नेली.

### पवई आयआयटीतील विद्यार्थ्याचं टोकाचं पाऊल

शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून पवई पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत. दर्शन सोलंकी तीन महिन्यांपूर्वी अहमदाबादहून आयआयटी पवईत आला होता. शिवाय त्याची कालच परीक्षा झाली होती. त्यानंतर त्याने आज आत्महत्या केली. परंतु, दर्शनने आत्महत्या का केली याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पवई पोलिसांनी या प्रकरणी आकस्मित मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरु केला आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. खोलीत बोर्डवर लिहिला संदेश

दरम्यान, दर्शन याने आत्महत्येपूर्वी माझ्या आत्महत्येला कोणालाही जबाबदार धरु नये, असा संदेश लिहिल्याची माहिती मिळाली आहे. दर्शन याने आत्महत्या करण्यापूर्वी त्याच्या वसतिगृहाच्या खोलीतील फलकावर संदेश लिहिला होता. त्यामुळे दर्शनने कोणत्या कारणामुळे आयुष्य संपवलं याचं गूढ कायम आहे पवई पोलिसात अपघाती मृत्युची नोंद दरम्यान पवई पोलिसांनी दर्शन सोलंकीच्या मृत्युची माहिती त्यांच्या कुटुंबियांना दिली आहे. या प्रकरणी कलम 174 सीआरपीसी अन्वये अपघाती मृत्युची नोंद केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी अधिक तपास सुरु केला आहे.


## मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर पश्चिम, ता.जि.ठाणे, ४०११०१
माहिती व जनसंपर्क विभाग

जा.क्र.मनपा/मावज/ १४५ /२०२२-२३ — दि. ०९/०२/२०२३

// निविदा सुचना //

मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागातील माझी वसुंधरा अभियान 3.0 अंतर्गत माझी वसुंधरा व पंचतत्वाची जनजागृती करीता विविध कामी Information Education and Communication (IEC) Activity करीता एजन्सी नेमणूक करणे कामी अनुभवी कंपनीकडुन स्पर्धात्मक ई-निविदा मागविण्यात येत आहेत. इच्छुक निविदा धारकांसाठी निविदेबाबत सविस्तर तपशिल https://mahatatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. निविदा ऑनलाईन स्विकारण्यात येतील व निविदा भरण्याची अंतिम दि. 17/02/2023 रोजी दु.1.00 वाजे पर्यंत राहील.

सही/-
(श्री. संजय शिंदे)
उपायुक्त (माहिती व जनसंपर्क)
मिरा भाईंदर महानगरपालिका

जा क्र मनपा/ मावज /५४२/२०२२-२३
दिनांक ०९/०२/२०२३

# पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार १४ ते २० फेब्रुवारी - २०२३


## धक्कादायक! पुण्यात दुहेरी हत्याकांड, रक्ताने माखलेला टिकाव घेऊन आरोपी रस्त्यावर, पोलिसांनी घेतलं ताब्यात



पुण्याच्या दापोडीत दुहेरी हत्याकांडाने एकच खळबळ उडाली आहे. आरोपी रक्ताने माखलेला टिकाव घेऊन रस्त्यावर फिरत होता. या प्रकरणी आरोपीला भोसरी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. शंकर नारायण काटे (वय- 60) आणि संगीता काटे (वय- 55) अशी हत्या झालेल्या पती-पत्नींची नावे आहेत. प्रमोद मगरुडकर (वय- 47) असे आरोपीचे नाव असून त्याला भोसरी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी आरोपीला घेतलं ताब्यात दुहेरी हत्याकांडाच्या घटनेनं पिंपरी चिंचवड हादरलं आहे. अद्याप या दुहेरी हत्येचे कारण समजू शकेलेले नाही. दापोडीत बेसावध असलेल्या दाम्पत्यावर टीकावाने घाव घालून दुहेरी हत्या करण्यात आली आहे. काटे दाम्पत्य हे त्यांच्या घरात बसले होते. तेव्हा, आरोपी प्रमोद त्यांच्यावर टिकावाचे घाव घातले. ही घटना शनिवारच्या रात्री दहा वाजता समोर आली आहे. आरोपी प्रमोद हा हत्या करून रक्ताने माखलेला टिकाव घेऊन रस्त्यावर दिसला. हे पाहून नागरिकांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी तत्काळ येऊन आरोपीला ताब्यात घेतले आहे. प्रमोद हा नुकताच दिल्लीवरून आलेला आहे.

## ऑनलाईन मेट्रिमोनिअल साईटवर ओळख; औरंगाबादच्या व्यापाऱ्याचा मध्यप्रदेशातील विधवेवर अनैसर्गिक अत्याचार

ऑनलाईन मेट्रिमोनिअल साईटवर ओळख झालेल्या औरंगाबाद शहरातील एका व्यापाऱ्याने मध्य प्रदेशातील जबलपूर येथील विधवेला लग्नाचे आमिष दाखवून अनेकवेळा अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी मध्य प्रदेशातील जबलपूरमधील विजयनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुमीत सुरेंद्र गुप्ता (रा. एन 1, सिडको) असे गुन्हा दाखल झालेल्या औरंगाबादेतील व्यापाऱ्याचे नाव आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, औरंगाबाद शहरातील एका व्यापाऱ्याने ऑनलाईन मॅट्रिमोनिअल साईटवर ओळख झालेल्या मध्य प्रदेशातील जबलपूर येथील विधवेला लग्नाचे आमिष दाखवून अनेकवेळा अत्याचार केले. एवढंच नाही तर या महिलेकडून या व्यापाऱ्याने 10 लाख 50 हजार रुपयेसुद्धा उकळले. धक्कादायक म्हणजे विधवेचा अपघात झाल्यानंतर देखील आरोपीने अनैसर्गिक अत्याचार



केले. तसेच त्यानंतर विधवेला लग्नास नकार देत दोघांचे आक्षेपार्ह छायाचित्र व्हायरल करण्याची धमकी दिली. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर महिलेने पोलिसात धाव घेत बलात्कार, फसवणुकीचा गुन्हा नोंदवला आहे. अपघातात जखमी असताना केला अनैसर्गिक अत्याचार

याबाबत पीडितेने पोलिसात दिलेल्या फिर्यादीनुसार, तिच्या पतीचे निधन झाल्यानंतर तिने एक 'मॅट्रिमोनिअल साईटवर लग्नासाठी नोंदणी केली होती. त्या ठिकाणी मार्च 2012 मध्ये समित गुप्ता याने रिक्वेस्ट पाठविली. त्यानुसार दोघांनी एकमेकांना मोबाईल नंबर शेअर केला. त्यानंतर दोघांत फोनवर संभाषण सुरू झाले. तेव्हा सुमित गुप्ता याने आपल्या पत्नीसोबत घटस्फोट होणार असून, तू मला आवडत असल्यामुळे आपण विवाह करू असे आश्वासन पीडितेला दिले. त्यानंतर पीडितेला भेटण्यासाठी तो जबलपूरला गेला. लग्नाचे आमिष दाखविल्यानंतर दोघांमध्ये 13 मे 2012 रोजी शारीरिक संबंध प्रस्थापित झाले. धक्कादायक म्हणजे अपघातात जखमी असताना आरोपीने पीडितेवर अनैसर्गिक अत्याचार केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडितेने केला गुन्हा दाखल

आरोपीने लग्नाचे आमिष दाखवत महिलेकडून 10 लाख 50 हजार रुपये घेतले होते. मात्र महिलेचा अपघात झाल्यावर तिला शस्त्रक्रियेसाठी पैसे लागत असल्याने तिने पैशांची मागणी केली. मात्र आरोपीने पैसेही देणार नाही आणि विवाहसुद्धा करणार नाही, अशी धमकी तीला देऊ लागला. तसेच दोघांचे आक्षेपार्ह छायाचित्र व्हायरल करण्याची धमकी देऊ लागला. दरम्यान आरोपी हा पीडितेला भेटण्यासाठी 1 फेब्रुवारीला जबलपूरला गेला. तो येताच पीडितेने विजयनगर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदविली. त्यानुसार गुन्हा दाखल होताच जबलपूर पोलिसांनी आरोपी सुमीतला बेड्या ठोकल्या. सध्या आरोपी न्यायालय कोठडीत कारागृहात आहे.

### रायगड : रो हाऊससाठीचा भूखंड मालक परदेशात गेल्यावर परस्पर हडपला, तिघांविरुद्ध गुन्हा

पनवेल- सिडको महामंडळाने विक्री केलेला रा हाऊससाठीचा भूखंड मालक परदेशात कामानिमित्त गेल्यावर परस्पर हडपल्याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणी तिघांवर गुन्हा नोंदविण्यात आला असून, तीन संशयीत आरोपींपैकी एकजण सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्याचा मुलगा आहे. विशेष म्हणजे, संबंधित रो हाऊसची बनावट कागदपत्रे ज्यावेळी बनविण्यात आली त्यावेळेस संबंधित सेवानिवृत्त पोलीस अधिकारी हे नवी मुंबई पोलीस दलात वरिष्ठ पोलीस निरिक्षक पदावर कार्यरत होते हा या प्रकरणातील सर्वा तमोठा योगायोग आहे. नवी मुंबई पोलीस दलातील काही पोलीस अत्यंत प्रामाणिक, तर काही पोलीस अधिकाऱ्यांचे प्रताप सेवानिवृत्तीनंतरही पाण्यावर तरंगत उजेडात येत आहेत. कळंबोलीतील रो हाऊस हडप प्रकरण हे त्यापैकी एक आहे. सूरेश पाल या व्यक्तीचा हा सेक्टर १४ येथील भूखंड क्रमांक ए १८ हा भूखंड आहे. सूरेश पाल हे सध्या सौदी अरेबियात कामानिमित्त आहेत. २७ वर्षांपूर्वी संबंधित भूखंड सिडको मंडळाची सर्व प्रक्रिया पार करून पाल यांना मिळाला. त्यानंतर ते परदेशात कामानिमित्त गेले. सूरेश पाल यांचे नातेवाईक हे वर्षा सहा महिन्याला येऊन त्यांच्या जागेची पाहणी करत होते.

## बोईसरमधील तरूण आयएसआयएस आणि अल कायद्याच्या संपर्कात? एनआयएनं घेतलं ताब्यात



आयएसआयएस आणि अल कायद्याच्या संपर्का त असल्याच्या संशयावरून बोईसर मधील एका उच्चशिक्षित संशयिताला राष्ट्रीय तपास संस्था अर्था त एनआयएनेचौकशीसाठी ताब्यात घेतलं आहे. बोईसर पश्चिमेतील एका सोसायटीतून या संशयिताला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. सध्या या तरूणाची एनआयएकडून कसून चौकशी करण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काल म्हणजे 10 फेब्रुवारी रोजी मध्यरात्रीपासून एनआयएकडून बोईसरमध्ये गुप्त पद्धतीने चौकशी सुरू असून आता या सअंशयिताला ताब्यात घेण्यात आलं आहे. हा संशयित तरुण कुवेत, सौदी अरेबियासह केरळ या ठिकाणी मागील काही काळापासून राहत असून मागील दोन महिन्यांपूर्वीच तो बोईसरमध्ये राहण्यास आला होता. या प्रकरणात स्थानिक पोलिसांकडूनही काही माहिती हाती लागली नसली तरी मागील काही दिवसांपूर्वी बेंगळुरू आणि मुंबईत एनआयएने केलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. या कारवाईत एनआयएने संशयित तरूणाचा मोबाईल आणि लॅपटॉप ताब्यात घेतला असून तो घरी असताना कोणाशी बोलत होता याबाबत आपल्याला काहीही माहिती नसल्याचं त्याच्या वडिलांकडून सांगण्यात आलं आहे. दरम्यान, एनआयएकडून संशयित तरूणाची कसून चौकशी सुरू आहे. त्याच्याकडून माहिती मिळाल्यानंतरच या प्रकरणी पुढील कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती मिळत आहे.

## मुंबई- पुणे एक्सप्रेस वेवर बेफाम गाड्या पळणा-यांविरोधात जबर कारवाई

# इतक्या जणांचे चलन कापले

**मुंबई :** मुंबई - पुणे एक्सप्रेस वेवर बेफाम वाहन चालवणा-यांविरोधात जोरदार कारवाई सुरू केली आहे. डिसेंबर ते जानेवारी महिन्यात झालेल्या कारवाईत ओव्हर स्पीडींग प्रकरणी एकूण 2301 वाहन चालकांवर कारवाई केली आहे. तर लेन कटींग प्रकरणी एकूण 1550 चालकांवर कारवाई झाली तर विना सिट बेल्ट) प्रकरणात 1007 चालकांवर कारवाई करण्यात आली आहे. जुना आणि नवीन अशा दोन्ही मुंबई- पुणे एक्सप्रेस हायवेवर ही कारवाई करण्यात आली आहे. परीवहन विभागाने नेमलेल्या विशेष पथकाने बेशिस्त वाहन चालकांवर एकूण 10,251 केसेस दाखल केल्या आहेत. या कारवाईचा लगेच रिजल्ट मिळाला आहे. महामार्गावरील देहू रोड ते अमृतांजन टप्प्यातील अपघात आणि मृत्यूचे प्रमाण घटले आहे. मुंबई - पुणे नव्या आणि जुन्या अशा दोन्ही महामार्गांवरील



अपघातांची संख्या त्यामुळे घटली आहे. गेल्यावर्षी डिसेंबर 2021 - जानेवारी - 2022 मध्ये नव्या आणि जुन्यावर अनुक्रमे 38 आणि 16 अपघाती मृत्यू झाले होते. यंदाच्या डिसेंबर 2022 - जानेवारी 2023 मध्ये नव्या आणि जुन्या महामार्गांवर अनुक्रमे 14 आणि 6 अशा संख्येत अपघाती मृत्यू घटल्याचे परिवहन उपायुक्त रस्ता ( सुरक्षा कक्ष ) भरत कळसकर यांनी सांगितले. मुंबई- पुणे एक्सप्रेस वेवर वाढते अपघात पाहून परीवहन विभागाने मुंबई - पुणे एक्सप्रेस वेवर बेफाम वाहन चालवणा-यांविरोधात जोरदार कारवाई सुरू केली आहे. मुंबई- पुणे एक्सप्रेस वेवर जानेवारी 2023 मध्ये झालेल्या कारवाईत ओव्हरस्पीडींगच्या एकूण 2,301 केस, लेन कटींगच्या 1550 केस, सिट बेल्ट न लावल्याच्या 1007 केस, रॉंग साईड पार्कींगच्या 466 केस दाखल झाल्या आहेत. असे एकूण 6,809 केसेस दाखल करण्यात आल्या आहेत. मुंबई मध्य आरटीओच्या पथकाने ओव्हर स्पीडींग प्रकरणी एकूण 847 गुन्हे दाखल केले आहे. तर खालोखाल ठाणे- 2 पथकाने ओव्हर स्पाडींग प्रकरणी 838 गुन्हे दाखल केले आहेत. जुन्या मुंबई- पुणे एक्सप्रेसवर ओव्हर स्पीडच्या केवळ 50 केस दाखल झाल्या आहेत. लेन कटींगचे 191 केस, विना सिट बेल्टच्या 446 केस दाखल केले आहेत. जुन्या मुंबई- पुणे एक्सप्रेसवर एकूण 3,442 केस परीवहन विभागाने दाखले केले आहे.

## महाराष्ट्राच्या राजकारणात भूकंपाचे संकेत, तब्बल 'इतक्या' आमदारांचा शिंदे गटात होणार पक्षप्रवेश?

**अमरावती :** महाराष्ट्राच्या



राजकारणात आगामी काळात खूप मोठ्या घडामोडी घडण्याचे संकेत आमदार बच्चू कडू यांनी दिले आहेत. बच्चू कडू यांनी आज आगामी काळातील घडामोडींच्या पार्श्वभूमीवर खूप मोठं विधान केलं आहे. आगामी काळात शिवसेनेचा ठाकरे गट वगळता तब्बल 10 ते 15 आमदारांचा शिंदे गटात प्रवेश होणार असल्याचा दावा बच्चू कडू यांनी केलाय. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणातील आगामी काळातील घडामोडींकडे महाराष्ट्रासह देशभरातील जनतेचं लक्ष वेधलं जाण्याची शक्यता आहे.

'ठाकरे गट वगळता आगामी काळात दुस-या पक्षातील 10-15 आमदारांचा पक्ष प्रवेश होऊ शकतो. 20-25 आमदार जरी इकडे तिकडे झाले तरी सरकार मजबुतीने पूर्ण काळ पूर्ण करेल', असा दावा बच्चू कडू यांनी केलाय. हा पक्षप्रवेश फक्त शिंदे गटच नव्हे तर भाजपातही होऊ शकतो, असा अंदाजही त्यांनी वर्तवला आहे.

'पक्ष प्रवेश आणि न्यायालयामुळे तारीख वर तारीख येत आहे. पुढील 15 दिवसात अधिवेशनाच्या आधी मोठ्या प्रमाणावर पक्ष प्रवेश होईल', अशी प्रतिक्रिया बच्चू कडू यांनी दिली.

महाराष्ट्रात नवं सरकार स्थापन होऊन आता आठ महिने होत आले आहेत. पण अद्यापही मंत्रिमंडळाच्या दुस-या टप्प्यातील विस्तार झालेला नाही. विशेष म्हणजे मंत्रिमंडळाच्या विस्तारावरुन शिंदे गटाच्या नेत्यांनी याआधीदेखील नाराजी व्यक्त केलीय. स्वतः बच्चू कडू यांनी दोन-तीन वेळेस मंत्रिमंडळाच्या विस्तारावरुन नाराजी व्यक्त केलीय.

## 19 लाखांचे हॉटेलचे बिल थकवले, 58 लाखांच्या ऑडीचा लिलाव होणार

**चंदीगड :** चंदीगडमध्ये हॉटेलच्या बिलाच्या वसुलीचे एक रंजक प्रकार समोर आला आहे. चंदीगडमधील एका आलिशान हॉटेलमध्ये 2 व्यक्ती थांबले होते. त्यांनी सहा महिने खूप मजा केली. सहा महिन्यांचे बिल 19 लाख रुपये झाले. परंतु बिल भरण्याची वेळ आली तेव्हा पसार होण्याचा प्रयत्न केला. हॉटेल व्यवस्थापनाने त्यांची आलिशान ऑडी आणि क्रूझ गाडी जप्त केली. त्याची किंमत 58 लाख आहे. या घटनेला पाच वर्षे उलटून गेली तरी दोघेही वाहने घेण्यासाठी आले नाहीत. आता चंदीगड औद्योगिक आणि पर्यटन विकास



महामंडळ 14 फेब्रुवारी म्हणजेच व्हॅलेंटाईन डेला या दोन्ही लक्झरी वाहनांचा लिलाव करणार आहे.

चंदिगडच्या पॉश सेक्टर 17 मध्ये शिवालिक ०् नावाने चार तारांकित हॉटेल आहे. 2018 मध्ये अश्विनी कुमार चोप्रा आणि रमणिक बन्सल नावाचे दोन ग्राहक येथे आले. ते सहा महिने हॉटेलमध्ये राहिले. त्यांनी हॉटेलच्या प्रत्येक सुविधेचा आनंद लुटला. त्यांनी चेक आउट केल्यावर हॉटेलने त्यांना 19 लाखांचे बिल दिले. हे बिल बघून दोघांची पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र हॉटेलच्या सुरक्षारक्षकांनी त्यांना पकडले. त्यानंतर त्याला बिल भरण्यास सांगण्यात आले. परंतु त्यांनी बिल भरले नाही. यामुळे त्यांच्या गाड्या जप्त करण्यात आल्या.

## नागपूर बायपासवर ट्रक चालकांकडून 'एंट्री'च्या नावावर अवैध वसुली



नागपूर जिल्ह्याच्या बायपासवरुन जाणाऱ्या ट्रक चालकांकडून 'एंट्री'च्या नावावर होणाऱ्या अवैध वसुली संदर्भा त अनेकवेळा परिवहन आयुक्तांपासून तर मंत्र्यांपर्यंतही तक्रारी झाल्या. मात्र त्यावर कारवाई झाली नाही मात्र लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ने केलेल्या कारवाईत आरटीओ निरीक्षकासह त्याने वसुलीसाठी नेमलेल्या दोन दलालांना वसुली करताना रंगेहाथ पकडण्यात आल्याने आरटीओ कर्म चाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. भ्रष्टाचाराच्या नावाने प्रादेशिक परिवहन विभाग (RTO) नेहमीच चर्चेत राहिले आहे. सामान्य नागरिकांच्या कामांपासून तर वाहनांना चेकपोस्टवर अडवून त्यांच्याकडून होणारी अवैध वसुली सर्व श्रुत आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना यासंदर्भा त युवक कॉंग्रेसने गेल्यावर्षी सतत आंदोलनही केले होते. प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांपासून तर परिवहन आयुक्तांपर्यंत तसेच मंत्र्यांनाही या अवैध वसुलीसंदर्भा त तक्रार केली होती. मात्र यावर कुठलीही कारवाई करण्यात आली नव्हती उलट आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते, हे विशेष. मात्र एसीबीच्या कारवाईमुळे आरटीओमधील भ्रष्टाचाराचे पितळ उघडे पडले आहेत. ट्रक चालकांना द्यावी लागते 500 रुपयांची 'एंट्री' प्राप्त माहितीनुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (ACB) ग्रामीण आरटीओच्या (RTO) निरीक्षकासह दोन दलालांना ट्रकचालकाकडून लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. या कारवाईने आरटीओ विभागात खळबळ उडाली. आरटीओ निरीक्षक अभिजित सुधीर मांदरे (वय 39 वर्षे), करण मधुकर काकडे (वय 28 वर्षे, रा. रामटेक) आणि विनोद महादेवराव लांजेवार (वय 48 वर्षे, रा. कामगार कॉलनी, सुभाषनगर) यांचा समावेश आहे. मांदरे ग्रामीण आरटीओमध्ये कार्यरत असून, त्यांची पोस्टिंग कांद्री चेकपोस्टवर होती. 33 वर्षीय ट्रकचालक बुधवारी (8 फेब्रुवारी) मनमाडहून रेवाकडे जात होता. मांजरे यांच्या दोन दलालांनी त्यांचे वाहन कांद्री पोस्टवर अडवले. त्याच्यावर जबरदस्तीने चालान कारवाई केली आणि 500 रुपयांची एंट्रीही मागितली.

## हिंडनबर्ग प्रकरणावर शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

**नवी दिल्ली :** अमेरिकेतून हिंडेनबर्ग नावाचे वादळ येते अन भारतात गौतम अदानींचे संपूर्ण साम्राज्य हादरून जाते. संसदेपासून शेअर मार्केटपर्यंत फक्त अदानींचीच चर्चा होत आहे. पंधरा दिवसांपूर्वी गौतम अदानी हे जगातील चौथे सर्वात श्रीमंत व्यक्ती होते. आता 21 व्या क्रमांकावर गेले आहे. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहचले आहे. सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेवर आता शुक्रवारी सुनावणी होणार आहे. गुरुवारी अदानी ग्रुपचे 10 शेअर पैकी नऊ शेअरमध्ये घसरण झाली होती.

हिंडेनबर्गच्या अहवालाचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात गेला आहे. हिंडेनबर्ग कंपनीचे मालक आणि संस्थापक नॅथन अँडरसन विरोधात कारवाई करण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे. वकील मनोहरलाल शर्मा यांनी ही जनहित याचिका दाखल केली आहे.

त्यावर सरन्यायाधीश डी वाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली खंडपीठात शुक्रवारी 10 फेब्रवारी रोजी सुनावणी करणार आहे. शॉर्ट सेलर अँडरसन तसेच त्यांच्या सहकार्यांनी लाखो गुंतवणूकदारांची फसवणूक केली आहे. त्यांच्यामुळे गुंतवणूकदारांचे मोठे नुकसान झाले आहे. हे नुकसान भरुन देण्याची मागणी केली आहे.

याचिकेनुसार, आयपीसी कलम 420 व 120 नुसार शॉर्ट सेलर अँडरसन यांच्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. अँडरसन यांनी भारतीय संस्थांविरोधात कट रचल्याचा आरोपही याचिकेत केला आहे.

## 'मी प्रफुल्ल पटेल यांच्या कार्यक्रमात, मग चर्चा तर होणारच;'

# देवेंद्र फडणवीस म्हणाले...

**गोंदिया :** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रफुल्ल पटेल यांच्या गोंदिया येथील कार्यक्रमाला हजेरी लावली. यानिमित्त देवेंद्र फडणवीस आणि प्रफुल्ल पटेल एकाच मंचावर आले होते. कार्यक्रमात बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मित्र प्रफुल्ल पटेल यांच्या निमंत्रणावरुन येथे आलो. स्वातंत्र्यानंतर समाजात योगदान देणा-यांमध्ये भंडारा - गोंदियात जिल्ह्यात मनोहर भाई पटेल यांचं नाव येतं. शिक्षण क्षेत्रात मनोहर भाई पटेल यांचं मोठं काम आहे. प्रफुल्ल पटेल आणि वर्षा पटेल यांच्या नेतृत्त्वात इथल्या शिक्षण संस्था सध्या चालत आहेत. पंतप्रधान मोदी यांच्या नवीन शिक्षण धोरणं घेऊन देशाचा विकास करतायत. सर्वात चांगली अर्थव्यवस्था तयार करण्यासाठी चांगल्या 'मन



रिसोर्चेसची गरज आहे.महाराष्ट्रात लवकरंच मेडिकल, इंजिनिअरिंग, पॉलिटेक्निक्समध्ये शिक्षण मराठीत सुरु करणार आहेत. पुढच्या काळात गावांमधून सर्वात चांगलं मानव संसाधन तयार होणार आहे. सज्जन जिंदल विदर्भात गुंतवणूक करतील. यासाठी आम्ही नक्की प्रयत्न करणार आहोत. महाराष्ट्रात गुंतवणूक येत आहे. सज्जन जिंदल आपल्याकडून चांगल्या गुंतवणुकीची अपेक्षा करतोय, असंही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

आता समृद्धी महामार्ग गोंदिया-गडचिरोलीपर्यंत जाणार आहे. एक तासांत नागपूर ते गोंदिया प्रवास करता येणार आहे. धानाच्या शेतक-यांना आता थेट बँक खात्यात बोनस जातो. अशी माहितीही त्यांनी दिली.

फडणवीस म्हणाले, प्रफुल्ल पटेल यांच्या कार्यक्रमात मी येथे आलो. यामुळं चर्चा तर होणारच आहे. राजकारणात आम्ही विचाराचे विरोधक असतो. पण व्यक्तीचे नाही. महाराष्ट्राची ही संस्कृती आहे. निवडणुकीत कितीही विरोधात बोललो तरी, सोबत चहा पितो. मला येथे बोलावलं याचा आनंद आहे, असंही फडणवीस यांनी सांगितलं.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्कः-9594418181 / 8424989898